
अहम् आवाम्

वर्ष नववे | अंक ११ | डिसेंबर २०२१ | पृष्ठे ५२

# वयम्

कल्पक, चौकस
किशोरांचे मासिक

मूल्य ₹ ६०/-




मिनू
अदिती पाध्ये-देसाई
aditeepd@gmail.com
तुला माहितीये, एका शास्त्रज्ञाच्या डोक्यावर सफरचंद पडलं आणि कसलातरी शोध लागला. सॉलिड ना!
ए.. आपण पण झाडाखाली बसून लावूया ना काहीतरी शोध-बीध.
अगं पण या बागेत सफरचंदाचं झाडच नाहीये.
नारळाचं आहे.
हं
पण नको.. तो नारळ जरा जास्तच मोठा आहे. इतका मोठा शोध नको लावायला.
ते बघ पेरूचं झाड. चल..
एका तासानंतर
साधारण किती वेळाने पडलेलं ते सफरचंद? मला भूक लागलीय.
मला पण.. अगं असं तर नसेल.. की शोध लावण्यासाठी सफरचंदाचंच झाड हवं?

RNI NO.MAHMUL/2013/53153
अहम् आवाम्
कल्पक, चौकस किशोरांचे मासिक
# वयम्
आपण सारे
वर्ष ९ | अंक ११ | डिसेंबर २०२१
कार्तिक/ मार्गशीर्ष शके १९४३

**प्रकाशक**
श्रीकांत बापट

**सल्लागार**
डॉ. अनिल काकोडकर
कुमार केतकर
डॉ. आनंद नाडकर्णी
डॉ. उदय निरगुडकर
अच्युत गोडबोले
राजीव तांबे
श्रीकांत वाड

**मुख्य संपादक**
शुभदा चौकर
(पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी)

**मुखपृष्ठ**
निलेश जाधव

**सुलेखन**
अच्युत पालव

**अंकातील चित्रे**
अदिती पाध्ये-देसाई, जुईली माहीमकर, आराध्य नाईक, रिया पटवर्धन

**वरिष्ठ उपसंपादक**
क्रांती गोडबोले-पाटील

**मांडणी-सजावट**
क्रांती गोडबोले-पाटील

**मुद्रितशोधन**
शिवानी ओक

**वितरण व्यवस्था**
राजेंद्र गोसावी

'वयम्' हे मासिक मालक, प्रकाशक श्रीकांत बापट यांनी मेसर्स रेड एलिफंट, ३१५/ए १, शाह अॅण्ड नाहर इंड. इस्टेट, ३रा मजला, एस. जे. मार्ग, लोअर परेल (प.) मुंबई- ४०००१३, येथे छापून, २०१, नंद चेंबर्स, वंदना सिनेमाजवळ, ठाणे- ४००६०२ येथे प्रसिद्ध केले. या अंकातील सर्व मतांशी संपादक सहमत आहेत असे नाही. सर्व हक्क प्रकाशकाधीन.

**संपादकीय विभाग :**
'वयम्' न्यू वंदना को.ऑप.हा.सो., ३रा मजला, लालबहादूर शास्त्री मार्ग, वंदना सिनेमाजवळ, ठाणे- ४००६०२.
दूरध्वनी : ०२२-२५९८६२७०
इमेल : info@wayam.in
www.wayam.in

# अंतरंग




**संपादकीय** : शुभदा चौकर– ४
**गाणारे झाड** : डॉ. सिसिलिया कार्व्हालो– ६
**'खिडकीतला निसर्ग' फोटो स्पर्धा निकाल**– १२
**आरशाची गोष्ट** – विद्या डेंगळे– १४
**चपखल** : प्रतिभा गोपुजकर– १६
**हर प्रश्नाला असते उत्तर** : डॉ. सुरेश सावंत– १७
**फिनलंडची शाळा (भाग-११)** : शिरीन कुलकर्णी– १८
**पुरातन दगडोबा** : प्रसाद सांडभोर– २०
**आपण चॉकलेट का खातो?** : डॉ. उज्ज्वला दळवी– २३
**वेचक-रोचक** : मेघना जोशी– २५
**Hide & Seek : Juilee Mahimkar**– २६
**सहज-शोध** : सोनाली कोलारकर-सोनार– २८
**नक्की वाचा + नेट-Key-भाषा** : धनवंती हर्डीकर– ३०
**चित्त त्यांचे पिल्लांपाशी** : मकरंद जोशी– ३३
**कल्पककला** : स्वरूपा वक्नाली– ३५
**Password Hunt** : Prachi Mokashi– ३६
**सायफाय कथा**– ४०
**माझे किशोरवय** : डॉ. अनिकेत सुळे– ४३
**ऋषी ऋण** : कांचन जोशी– ४६
**जीभ व डोळे तृप्त करण्याची किमया** : विशाखा कुलकर्णी– ४८

**कागद, छपाई यांसह सर्व खर्च वाढल्याने जानेवारी २०२२ पासून वयम् मासिकाचे वार्षिक शुल्क वाढवून ते रु. ८०० करण्यात येणार आहे. सध्याच्या सभासदांना त्यांचे सभासदत्व असेपर्यंत आधीप्रमाणेच अंक मिळत राहील, याची कृपया नोंद घ्यावी.**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

'वयम्'वाचकांनो, दर महिन्याला २० तारखेपर्यंत तुम्हांला अंक पोहोचला नाही तर 'वयम्'च्या दूरध्वनी क्रमांकावर सोमवार ते शुक्रवार सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळात संपर्क साधावा, ही विनंती. **-संपादकीय आणि वितरण विभाग**

# संपादकीय

# आनंद पेरणारा सांताक्लॉज



DEAR EDITOR, I am 8 years old. Some of my little friends say there is no Santa Claus. Papa says, 'If you see it in THE SUN it's so.' Please tell me the truth; is there a Santa Claus?

*-Virginia O'hanlon.*
*115 West Ninety-Fifth Street.*

*प्रिय संपादक महोदय,*
*माझे काही मित्र-मैत्रिणी म्हणतात की सांताक्लॉज नसतोच मुळी. बाबांना विचारलं तर ते म्हणाले, "द सन वृत्तपत्राला विचार, ते म्हणाले, तर असेल." आता तुम्हीच मला खरं खरं सांगा की सांताक्लॉज असतो ना?*
*-व्हर्जिनिया*

**'वयम्' दोस्तांनो,**

आठ वर्षे वयाच्या अमेरिकन मुलीचे हे निरागस पत्र. तिने न्यूयॉर्कच्या 'द सन' या लोकप्रिय वृत्तपत्राला १८९७ मध्ये हे पत्र पाठवले. व्हर्जिनियाचे हे पत्र फ्रान्सिस चर्च नावाच्या पत्रकाराच्या हातात पडले. तो जरा विचारात पडला. फ्रान्सिस चर्चचा देवावर किंवा अमूर्त कल्पनांवर बिलकूल विश्वास नव्हता. पण त्यावेळी त्याने नुकतीच अमेरिकन यादवी युद्धात बातमीदारी केली होती. युद्धाच्या संहारक बातम्या लिहिताना दुःख, यातना आणि निराशा या भावना माणसाला कशा कोमेजून टाकतात, ते सत्य त्याने जवळून पाहिले होते. त्या पार्श्वभूमीवर त्याला वाटले की, लहान मुलांना आणि मोठ्या माणसांनाही उमेद देणारा लेख लिहिण्याची ही नामी संधी आहे; आणि त्याने चक्क व्हर्जिनियाला उत्तर देणारा संपादकीय लेख लिहिला.

त्या लेखात त्याने जे लिहिले, त्याचा आशय असा होता- "व्हर्जिनिया, तुझे मित्र-मैत्रिणी म्हणतात ते काही खरं नाही गं. त्यांना वाटतंय की जे दिसतं तेच खरं. पण मला सांग, प्रेम, विश्वास, औदार्य या भावनांनी आपल्याला छान वाटतं. पण दिसतात का त्या? मात्र त्या भावना जाणवतात, म्हणून आपल्याला आनंद मिळतो. हे जग सुंदर करणारा सांताक्लॉज नसतोच, असं म्हणण्याचं धाडस कोण करेल? असा भाबडा विश्वास नसेल तर आपल्याला निराशेतून बाहेर काढणाऱ्या आशेचा दिलासा मिळेल का? 'मन में है विश्वास- हम होंगे कामयाब एक दिन...' अशी गाणी गायलाच नकोत मग! खराखुरा सांताक्लॉज चालत आपल्यापर्यंत आलेला दिसला नसेल कुणाला, पण त्याच्या येण्याच्या कल्पनेने जो आनंद आपल्याला होतो, तो तर जाणवतोच ना? जगातल्या बहुतांश सच्च्या गोष्टी मुलांनाच काय, मोठ्यांनाही दिसत नाहीत कधीच. पण त्या असतात. आपल्याला गोष्टीतली परी कधी गवतात खेळताना दिसते? कवितेतल्या कल्पना डोळ्यांना दिसतात? पण या सर्व सुखावणाऱ्या गोष्टी आणि कल्पना

आपल्या मनात आनंदाचा, आशेचा आणि चांगुलपणाचा दिवा तेवत ठेवतात. सांताक्लॉज असतो आणि कायम असणार.. पुढे अब्जावधी वर्षे तो असणारच आणि मुलांच्या ह्रदयात आनंद पेरत राहणारच !'

हा लेख पुढे जगभर गाजला. अनेक भाषांत रूपांतरित झाला. त्यावर सिनेमादेखील निघाला.



सांताक्लॉज ही वल्ली आहे, कल्पना आहे... मनोवृत्ती आहे ! त्याच उत्फुल्ल वृत्तीने आपण प्रत्येक सण साजरा करतो. करोनाच्या संकटाने गेले पावणेदोन वर्षे आपल्याला घायाळ केले. त्या काजळी वातावरणाला दूर करण्यासाठी आपण  दिवाळीत घरात आणि घराबाहेरही पणत्या लावल्या... मनोमन प्रार्थना केली की, हा काळ सरू दे. दिव्यांच्या उत्सवाला साजेसा वयम् दिवाळी अंक काढण्याचा प्रयत्न आम्ही केला. 'भावनिक एकजूट' या आपल्या थीमभोवतीचे साहित्य आपल्या सर्व साहित्यिकांनी व कलाकारांनी देऊ केले. चेटकीण कल्पनेला मूर्त रूप देणाऱ्या वैभव मांगले यांनी आपला विचार व्यक्त करणारे सुंदर चित्र मुखपृष्ठासाठी दिले. तुम्ही सर्व वाचकांनी त्या अंकाचे मर्म छान समजून घेऊन भरभरून प्रतिसाद दिलात. तुमच्या प्रतिक्रियांनी आमच्या मनाची पोतडी भरून गेली आहे. तुमचे समाधान करणारे अंक सातत्याने साकारण्याचे आव्हान आता आम्हांला पेलायचे आहे; ही जाणीवही आहेच.

यंदा काहींना पोस्टाने पाठवलेला दिवाळी अंक मिळाला नाही, ती मुलं हिरमुसली. त्यांची नाखुषी दूर करण्यासाठी त्यांना आम्ही दिवाळी अंक परत पाठवला. मागणी अपेक्षेपेक्षा जास्त आली म्हणून पुन्हा नव्याने अंक प्रिंट करून घेतला. भरभरून प्रेम करणारे तुमच्यासारखे वाचक आहेत, म्हणून दर महिन्याला नवनवीन प्रयोग करत अंक साकारण्याची मजा आम्ही अनुभवत असतो.

पोतडीभर आनंद वाहून आणत, आपल्याला वाटणारी 'सांताक्लॉजी' मनोवृत्ती आपल्यात भिनो आणि कायम टिकून राहो- असं गिफ्ट यावेळी त्या सांताक्लॉजकडे मागते- आपल्या सर्वांसाठी !

**-शुभदा चौकर**
*cshubhada@gmail.com*

**मुखपृष्ठाविषयी-** आपण जून महिन्याच्या अंकात 'खिडकीतला निसर्ग' फोटो स्पर्धा आयोजित केली होती. वाचक मुलांनी विषय समजून घेऊन भरभरून प्रतिसाद दिला. यातल्या काही प्रातिनिधिक फोटोंचा वापर करून यावेळच्या आपल्या अंकाचं मुखपृष्ठ साकारलं आहे.

सिंधुदुर्गचा मंथन, गोव्याची मोक्षदा, नाशिकची आनंदी आणि पुण्याचा अर्जुन यांचे फोटो मुखपृष्ठावर विराजमान झाले आहेत. तुम्हा सर्व शहाण्या व कल्पक वाचकांनी या पावणेदोन वर्षांत घरात राहून आनंदी, उत्साही, उद्योगी राहण्याचा जो प्रयत्न केलात, त्याला दाद देण्यासाठी ही रचना !



एकीकडे 'कृष्णकमळ', तर त्याचंच दुसरं नाव 'ख्रिस्तवेदनाकंद'. दुसरीकडे 'ब्रह्मकमळ' वा 'ख्रिस्तजन्मपुष्प'चं झाड. त्याच्या बाजूला 'येशूहृद्यपर्ण' झाड... फूल तर एकाच प्रकारचं, एकाच मातीतून आलेलं, पण ख्रिस्ती लोकांना त्यात बालख्रिस्त दिसतो; तर हिंदूंना त्यात बाळकृष्ण दिसतो!

# गाणारे झाड

**डिसेंबरचा** थंडावा वातावरण वेढून राहिलेला. अंगणातली सारी झाडं बहरून आलेली.. गर्द हिरवी पानं तरारून आलेली... त्यावर पिवळी, लाल, सफेद, गुलाबी, केसरी रंगाची फुलं आपापले झगे फुलारून बसलेली. मालकिणीच्या घरात नाताळची तयारी चाललेली. घरातली लहानगी चारही बालकं नाताळ साजरा करण्यात मग्न होती. अंगणातल्या कोपऱ्यातलं 'नाताळ झाड' हिरवी टोपी घालून बसल्यासारखं दिसत होतं. त्याच्या शेजारीच एकीकडे 'ख्रिस्तवेदनाकंद' किंवा 'कृष्णकमळ' झाड. दुसरीकडे 'ब्रह्मकमळ' वा 'ख्रिस्तजन्मपुष्प' झाड. त्याच्याही बाजूला 'येशूहृद्यपर्ण' झाड. परदेशी आणि भारतीय जातीची विविध झाडं अंगणात छानपैकी एकत्र डोलत होती... सुगंधकुप्या उघडून बसलेली जणू!

रिबेका, रोहीत, नॉरिस्का आणि शलाका लाकडी खोक्यात ठेवलेलं कृत्रिम झाड दरवर्षीप्रमाणे खोक्यातून काढून, दिव्यांच्या माळा, तारे, सांताक्लॉज यांच्या छोट्या छोट्या मूर्ती लावून झगमगीत करत होती. ओटीवरचं त्या खोट्या नाताळवृक्षाचं सजवणं पाहताच अंगणातील जिवंत नाताळवृक्षाला कंठ फुटला आणि आपल्या शेजारीच असलेल्या 'ख्रिस्तजन्मपुष्पा'ला तो म्हणाला, "मला फार आनंद वाटतोय की, माझ्या जिवंत देहावर,

खांद्या-फांद्यांवर सजावट केली जात नाहीये. या घरातील बालकं शहाणी आहेत. त्यांना माहिती आहे की, मला त्रास होईल, म्हणून दरवर्षी खोक्यातलं ते निर्जीव झाड काढतात आणि सजवतात...”

“हे छानच आहे की!” ख्रिस्तजन्मफूल म्हणालं, “माझ्या बाबतीत तसं होत नाही. कारण माझ्याजवळ वर्षातून एकदाच कोणीतरी फिरकतं.. कधीतरी नाताळच्या रात्रीच माझं फूल उमलून येतं... मग काय? आपल्या आसपासच्या घरातील कितीतरी लोक येतात मला बघायला.”

“होय. तू इतरवेळीही फुलतोस ना? मी बघतो ना, किती लोक येतात तुला न्याहाळायला. आपण दोघंही येशू जन्माशी संबंधित. पण तुझं ‘दर्शन’ वेगळं आणि माझं ‘प्रदर्शन’ वेगळं. तुझं दर्शन हे लोक गुडघे टेकून घेतात ना?”

“होय तर! रात्री नऊच्या दरम्यान माझ्यावरचं फूल फुलायला सुरुवात होते. मध्यरात्री पूर्ण फुलतं. मग त्यात एक पाळणा दिसतो. त्यात छोटं बाळ




*चित्रं- अदिती पाध्ये-देसाई*

दिसतं. त्याच्या दोन्ही बाजूला येशूचे पालक जोसेफ आणि मेरी दिसतात. पांढऱ्याशुभ्र पाकळ्यांचं एक पवित्र वातावरण त्यांना दिसतं.. त्यात त्यांना येशूचा जन्म झालेला, गाईचा गोठा असल्यासारखंच भासतं...” येशूहृदयाची पानं असलेलं झाड अवाक् होऊन ऐकत होतं. मग डुलत डुलत ख्रिस्तजन्मपुष्प म्हणालं, “ख्रिस्तेतर समाजात मला ब्रह्मकमळ म्हणतात. नंदाष्टमीच्या दिवशी जेव्हा माझ्यावर फूल फुलतं तेव्हा त्यांना पाळण्यात कृष्ण दिसतो.”

“ही तर मोठी गंमतच आहे ना! बोगनवेलीवरची शुभ्र आणि लालभडक फुलं आपल्या शब्दांत मार्दव आणत म्हणाली, “फूल तर एकाच प्रकारचं, एकाच मातीतून आलेलं, पण ख्रिस्ती लोकांना बालख्रिस्त दिसतो, तर हिंदूंना त्यात बाळकृष्ण दिसतो.”

येशूहृदयाची पानं असलेलं झाड म्हणालं, “अरे मी तर अळूच्या पानासारखं पान. पण माझ्या पानांवर छोटे-छोटे ठिपके लाल-लाल व पांढरे.. माझ्या पानाचा आकार हृदयासारखा. पण ख्रिस्ती वस्तीत मला येशूहृदयाचं पान म्हणून ओळखलं जातं. आणि इतर वस्तीत मी त्यांची पोटपूजा करतो. आहे की नाही गंमत!”



नाताळवृक्ष म्हणाला, “आपले सण-उत्सव मुळात एकच संदेश देतात की, निसर्गाच्या जवळ जा! तुम्हांला माहितीय का मी ‘नाताळवृक्ष’ म्हणून कसा जन्मास आलो ते?”

“नाही नाही.. आम्हांला काहीच माहीत नाही. एक तर तुम्ही आला आहात परदेशातून आणि या भूमीत रुजला आहात..” ...गावठी गुलाब आपले गुलाबी गुलबक्षी गाल फुगवीत म्हणाला. नाताळवृक्षाच्या अंगभर हिरवे गरगरीत रोमांच उठले.. म्हणाला, “हिमाच्छादित प्रदेशातील माझं घराणं. बर्फ माझ्या अंगावर फारसा ठरत नाही. थरथरत बुडाशी पडतो. पण काही हिमकण इतके लगटून बसतात की, तिथल्या तिथेच गोठून त्याचे विविध आकार होतात. हिरव्यावर शुभ्र आकृत्या उठून दिसतात. एक तर सारी झाडं आपली पानं-फुलं ढाळून वा झाडून भुंडी झालेली असतात... वर्षभर हरितवस्त्र धारण करणारा मी एकटाच वृक्ष बरं का! ख्रिस्ती श्रद्धेनुसार सार्वकालिक जीवन प्राप्त झालेला मी, म्हणून मला एवढं महत्त्व! म्हणून मला ‘नाताळवृक्ष’ म्हणतात. आणि त्याचंही कारण असं की, माझा आकार एखाद्या कोनासारखा आणि कोनाड्यात वसलेल्या झोपडीसारखाही, म्हणजेच गाईच्या गोठ्यासारखा म्हणा ना! झाडाच्या शेंड्यावर स्थिरावलेला बर्फ एखाद्या ताऱ्यासारखा शोभतो. निमुळत्या फांद्यांवर अडकलेले बर्फाचे कण काचेरी मण्यांसारखे हिऱ्या-माणकांसारखे चमकतात. प्रकाशात आणि रात्रीच्या दिव्यांच्या उजेडात, काही दवबिंदू टपकतात. ते तर मण्यांच्या माळेसारखे दिसतात. माझ्या फांदीफांदीला जणू सुया लगडलेल्या असतात. अशी त्यांची कशिदाकारी चाललेली असते.”

सूचीपर्णी म्हणजे सुईसारखी पाने असलेल्या या नाताळवृक्षाचं बोलणं सारी झाडं पानांचे कान वा कोन करून ऐकत होते. त्यांना विशेष आश्चर्य वाटत होतं की, अनेक धर्मांत त्यांचे प्रेषित, संत वा थोर विभूती यांच्या जन्माचा आणि जीवनाचा संदर्भ झाडांशी जोडल्यामुळे सर्वांनीच

वृक्षपूजेला महत्त्व दिलेलं आहे!"

नाताळवृक्ष मान ताठ ठेवून पुढे बोलू लागला, "आम्ही फर सूचीपर्णी वृक्ष. आमची पानं अगदी टोकदार पण कोणाला टोचत मात्र नाहीत ती. बर्फाळ प्रदेशात आमची प्रजाती अधिक असल्याकारणाने नाताळच्या दिवसात आम्हांला अधिक सुशोभित केलं जातं. माझा आकारही आकाशकंदीलासारखा असल्याने आनंद साजरा करण्यासाठी आम्हांला निवडलं. माझ्याशी संबंधित दोन गोष्टी सांगू का?"

"सांग ना.. सांग ना.." जास्वंद, मोगरा, बोगनवेल, येशूहृदयाचे पानझाड, येशू काळजाचे फूलझाड साऱ्यांनी एकच गिल्ला केला. आपली स्थितप्रज्ञता कायम ठेवून ख्रिसमस ट्री बोलू लागले, "सेंट बोनिफस एकदा इंग्लंडहून जर्मनीला जात असताना वाटेत त्यांना जे दृश्य दिसलं ते पाहून तो हादरून गेला. एक तरुण मुलगा ओकच्या झाडाची पूजा करीत होता. ते पाहून काही अश्रद्ध लोकांनी त्याला बळी म्हणून चढवायचं ठरवलं होतं. पण आश्चर्य असं की, त्या ओकच्या झाडातून फरचं झाड फुरफुरलं. सेंट बोनिफसने त्याचा अर्थ असा घेतला की, ही तर ख्रिस्ती श्रद्धा आहे. मरणातून पुन्हा उठणे ख्रिस्ताच्या पुनरूत्थासारखे, तेव्हापासून ख्रिस्ती श्रद्धा दर्शविणारे झाड म्हणून मला 'नाताळवृक्षा'चा मान मिळाला." मग मोठ्या थाटात त्याने आणखी एक सत्यकथा सांगितली, "जर्मन धर्मोपदेशक मार्टिन ल्युथर एकदा जंगलात फिरत होते. वेळ रात्रीची. फिरता फिरता त्यांना झाडांच्या फांद्यांतून तारे चमकताना दिसले. जणू आकाशातील तारे त्या झाडावर उतरले होते. ते दृश्य त्यांना इतकं सुंदर वाटलं की, ते घरी गेले आणि आपल्या मुलांना सांगितलं की मला ख्रिस्त जन्माची आठवण झाली. स्वर्गीय वातावरण सोडून तो पृथ्वीतलावर आल्याची आठवण त्या झाडाने दिली. आणि त्यानंतर मग या फरच्या जातीतील झाडाला 'ख्रिसमस ट्री' म्हणून ओळखले जाऊ लागले."

'ख्रिसमस ट्री'च्या अशा कथा ऐकून आसपासच्या झाडांना वाटू लागले की, आपलाही असा काही इतिहास असला पाहिजे. आपण तो जाणून घेतला पाहिजे... बऱ्याच वेळापासून कृष्णकमळ म्हणजे येशूच्या काळजाचे फूल एका कोपऱ्यात गप्प बसून होते. त्या फुलांच्या सहस्र पाकळया थरथरल्या. जांभळया रंगाचा आपला झगा सावरीत ते बोलले, "येशू ख्रिस्ताला सुळावर चढवले, त्यावेळचा त्याचा दुःखदायक अनुभव, यातना सहन करताना त्याने परिधान केलेला जांभळया रंगाचा झगा... हा वेदनादायी क्षण सूचित करण्यासाठी मला येशूच्या काळजाचे फूल म्हणजेच 'पॅशन फ्लॉवर' म्हणतात. आणि भारतातील काही लोक मला 'कृष्णकमळ' म्हणतात कारण माझ्या शेकडो पाकळया म्हणजे कौरव, पाच पुंकेसर म्हणजे पांडव आणि मध्यभागी द्रौपदी!"

येशूहृदयाची पानं असलेलं झाड म्हणालं, "हो हो! मी हे ऐकलं होतं बरं का! आणि असंही ऐकलं होतं की ते पाच पुंकेसर म्हणजे येशूच्या पाच






जखमा, त्याच्या हातापायात ठोकलेले खिळे आणि त्याच्या कुशीत रुतलेला भाला आणि मध्यभागीचा दाणा म्हणजे ख्रिस्त आणि जांभळया रंगाची दाणेदार दले म्हणजे त्याच्या किरमिजी रंगाच्या झग्याला पडलेल्या चुण्या."

"अरेच्चा, तुला बरं माहीत", कृष्णकमळ म्हणालं, "अरे, मला 'क्लेशकमळ' असंही म्हणतात. येशू ख्रिस्ताने सहन केलेले क्लेश म्हणून 'क्लेशकमळ' हे नवे मराठी नाव ऐकून 'पॅशन फ्लॉवर'वरील जांभळा रंग अधिकच लकाकू लागला.

ज्या अंगणात फुलाफुलांची ही चर्चा चालली होती, त्या घराचं नाव होतं 'मे फ्लॉवर'. मे महिन्यात उमललेली फुलं. पण त्या मालकिणीचं नाव 'मेविस'. तिने अंगणात फुलझाडं, पानझाडं लावून छानशी बाग केली होती. परसदारी आंबा, चिंच, केळी, कडीपत्ता, शेवगा अशी झाडं लावली होती. तिच्या नवऱ्याचे नाव होते फ्लोरेन्स. मग दोघांच्या नावांच्या एकत्रीकरणातून घराचं नाव 'मे फ्लॉवर' झालं. मे महिन्यातही त्यांची बाग बहरलेली होती. डिसेंबर महिना सुरू झाला की, तिच्या नातवंडांची लगबग सुरू होते. नाताळवृक्ष सजू लागतो. फ्लॉरेन्सने एकदा अमेरिकेतून 'पॉईनसेतिया' फुलांची म्हणजे कागदी, रबरी अशी फुलं असलेली एक कुंडी आणली होती. मेविस दर नाताळवेळी ती कुंडी कपाटातून जपून बाहेर काढीत असे आणि मुलं-नातवंडांनी तयार केलेल्या गोठ्यासमोर ठेवीत असे. ती लालजर्द 'पॉईनसेतिया'ची फुलं नुकतीच उमलल्यासारखी दिसत.

आपल्या आजीच्या हातून ती कुंडी घेत, तिची नातवंडं तिला विचारू लागली, "हे कोणतं फूल आज्जी?" पॉईनसेतिया- हे झाड आपल्याकडचं नाही... मेक्सिकोचं आहे. त्याची एक गोष्ट माहितीय का तुम्हांला?"

"त्याची एक वेगळीच गोष्ट आहे. पेपिटा नावाची मुलगी आणि तिचा भाऊ पेद्रू हे नाताळच्या दिवशी चर्चमध्ये जाताना बाळ येशूला अर्पण करण्यासाठी काही नाही आपल्याकडे, म्हणून हिरमुसले होऊन बसले होते. काहीजण फुले, फळे, भाजी, अंडी, असं काही बाळ येशूपुढे ठेवतात. पेद्रू म्हणाला, 'आपण बाळ येशूला प्रेमानं दिलेलं काहीही त्याला पोचतं. आपण असं करूया की, रस्त्याने जाताना रस्त्याच्या कडेला जी रानफुलं उगवलेली असतात ना, त्याचा आपण गुच्छ करू. या रानफुलांकडे कोणाचंच लक्ष नसतं. आपण तेच वाहूया बाळ येशूला.'



रस्त्याने जाता जाता पेपिटा आणि पेद्रू यांनी रस्त्याकडेची फुलं गोळा करायला सुरुवात केली. त्या फुलांना ना सुवास होता ना रंग. त्या छोट्या छोट्या फुलांचे त्यांनी गुच्छ केले. छोट्याशा परडीत घातले. आणि हे छोटेसे बहीण-भाऊ चर्चकडे निघाले. चर्चमध्ये पोहोचल्यावर त्यांना दिसलं की सर्वांच्या हातात छान छान फुलांचे गुच्छ, फळांच्या करंड्या, काय काय वस्तू आहेत. पेपिटाने आपली परडी आपल्या झबल्याच्या टोकाने झाकून घेतली होती. ती दबकत दबकत चालत होती. ती मनातल्या मनात प्रार्थना करीत होती- "बाळ येशू, आमची ही भेट तू गोड मानून घे. स्वीकार करशील ना?"

पेपिटा डोळे मिटून बाळ येशूशी बोलत होती. ती आणि तिचा लहानगा भाऊ चर्चमधील त्या बाळ येशूसाठी केलेल्या गोठ्याच्या देखाव्याजवळ पोहोचले. तिने घाबरत घाबरत आपल्या फ्रॉकचे टोक बाजूला केले आणि परत तिकडे पाहू लागली. काय आश्चर्य! ती फुले लालेलाल झाली होती.. इतकी लालजर्द, ताजी सुंदर फुलं तेथे जमलेल्यांपैकी कोणाकडेच नव्हती. आता तेथील आसपासचे लोक पेपिटा आणि पेद्रूकडे बघत होते. पेपिटा फक्त एवढंच म्हणाली, "आपण जे प्रेमाने देतो त्याला हृदयाचा रंग चढतो आणि ते देवाला पोहोचतं."

मेविस आजीची नातवंडं हरखून गेली. जास्वंद, गुलाब, मोगरा, क्लेशकमळ, ख्रिस्तजन्मफूल येशूहृदयाची पर्णे, बोगनवेली साऱ्यांना फार आनंद झाला. इतक्यात वाऱ्याची झुळूक आली. साऱ्या वृक्षवेलींवरची पानं-फुलं लहरली, थरथरली आणि वाऱ्याबरोबर गाऊ लागली-

*गुंतली पाने पानांत हिरवी गात बाळयेशूचे गाणे*
*झुलणाऱ्या सृष्टीशी युगायुगांचे आमचे नाते..*
*खांद्याफांद्यांवर आमुच्या गुपित ठेवते सृष्टी*
*मानवजात एक परी देते जीवनदृष्टी..*
*उधळूनी देते अनंत हस्ते रंग गंधाची दुनिया*
*शाश्वत तेज फांकविणे ही सृष्टीची किमया..*
*सण सारे उल्हासाचे जगताच्या थोर विभूती*
*स्मरण त्यांचे करूया गुंफुनी हात हाती...*

**-डॉ. सिसिलिया कार्व्हालो**
*drceciliacar@gmail.com*
*(ज्येष्ठ साहित्यिक)*

# ‘खिडकीतला निसर्ग’ फोटो स्पर्धेचा निकाल

**‘वयम्’** मासिकाच्या जून महिन्याच्या अंकाच्या मुखपृष्ठावर सीमा राजेशिर्के यांनी काढलेला फोटो होता. त्यात खिडकीत आलेले पक्षी होते. त्याच महिन्याच्या अंकात सीमा राजेशिर्के यांच्या Window Birding या त्यांच्या छंदाबाबत आणि त्यांच्या फिल्मविषयी विजयराज बोधनकर यांनी लिहिलेला ‘खिडकीतले पक्षी’ हा लेख प्रसिद्ध झाला होता. तो तुम्ही वाचला असेल. त्यावर आधारित ‘वयम्’ मासिकाने ‘खिडकीतला निसर्ग- फोटो स्पर्धा!’ चौथी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केली होती. यामध्ये तुमच्या घरातून, वस्तीतून, आवारातून, गच्चीतून निसर्गातली जी जी गंमत दिसते, तिचे फोटो काढायचे होते. त्यातला फक्त एक फोटो आम्हांला पाठवायचा होता. त्या फोटोखाली त्याचं वर्णन करणारी दोन ते चार वाक्यं लिहायची होती. मात्र, त्यात एक अट अशी होती की, त्या फोटोतून कळलं पाहिजे की, तो तुम्ही तुमच्या घरातून किंवा आवारातून काढलाय. एरवी आपण बाहेर फिरायला गेलो की, निसर्गाचे फोटो काढतो, तसे फोटो या स्पर्धेत अपेक्षित नव्हते. आपल्याला दाखवायचा होता घरातून दिसणारा निसर्ग!

मुलांनी विषय समजून घेऊन भरभरून प्रतिसाद दिला. सुमारे १५० फोटो एन्ट्रीज आमच्याकडे आल्या. संपूर्ण महाराष्ट्रातून या एन्ट्रीज होत्या. सीमा राजेशिर्के यांनी या स्पर्धेचे परीक्षण केले. ‘वयम्’च्या प्रथेप्रमाणे एक, दोन असे नंबर न काढता विजेते १० आणि उत्तेजनार्थ १४ स्पर्धक निवडले आहेत. सर्व विजेत्यांचे अभिनंदन. सहभागी झालेल्या सर्वांचे कौतुक!

**परीक्षकांचे मनोगत-**

फोटो परीक्षण करताना हे सारे वयाने लहान असणारे छायाचित्रकार निसर्गात रमणारे, नियमितपणे घरातला आणि घराभोवतालचा निसर्ग जपणारे आहेत हे लक्षात येत होते आणि याचा आनंद वाटत होता.

यातील काही फोटो बाजूला काढावे लागले याचे वाईट वाटते आहे. कारण ते फोटो खूप क्रॉप केले आहेत; तर काहींवर कॅप्शन लिहिल्या आहेत.

निवडलेल्या वर्गात एक फोटो महत्त्वाचा आहे, ज्यात पोपट बिस्कीट खात आहे. खरे तर पक्ष्यांना मैद्याचे, तेलकट, तिखट, खारट पदार्थ कधीही देऊ नयेत; ते त्यांच्या आरोग्यासाठी चांगले नसते. तुम्ही मुलांनी हे नक्की लक्षात ठेवा हं! काही फोटोंमध्ये खिडकीत आरामात बसलेले पक्षी बघताना मला आमच्या घराच्या खिडकीची आठवण होत होती... अभ्यास सांभाळून निसर्गातील गमतीजमती डोळसपणे बघताना तुम्हा छायाचित्रकारांच्या मनात निसर्ग-संवर्धनाचं बीज आपसूकपणे रुजलं जात आहे, याचं समाधान वाटतंय. छायाचित्रणाचा छंद तुम्ही असाच जोपासावा, तो सदैव वाढता ठेवावा यासाठी तुम्हा सर्वांना मनापासून शुभेच्छा आणि आशीर्वाद.

**-सीमा राजेशिर्के**

**सर्व विजेत्यांचे फोटो एकाहून एक सरस आहेत. परंतु एकाच अंकात सर्व फोटो प्रसिद्ध केले तर खूप जागा व्यापेल, म्हणून प्रत्येक अंकात काही फोटोंचा आस्वाद घेऊया.**



**Food for thought : care without boundaries**

-**Mohul Prasanna Gandhi,** *7th, Jnana Prabodhini Prashala, Pune*

**Due to corona's fear, meeting between parrots held with social distancing norms.**

-**Ved Kiran Madkar**, *4 th, D.A.V.Public School, Airoli*



# आरशाची गोष्ट

**आमच्या** घरी मम्माच्या खोलीत एक लांबलचक काच होती. मम्मा त्यात येता-जाता बघायची. कधी केस ठीक करायची, तर कधी डाव्या-उजव्या बाजूला वळत काचेत बघायची. कधी दागिने घालून स्वतःकडे बघायची. पण आमच्या इंदूबाई मम्मापेक्षाही जास्त वेळ काचेत बघायची. तिने मम्माच्या कुठल्याही गोष्टीला हात लावला की, मी तिच्यावर गुरगुरायचो. मग तीही माझ्यावर डाफरायची.

म्हणायची, “ए ब्रान्डो (Brando), असा काय बघतोस रं माझ्याकडं?”

ती थोडी मला घाबरायचीही. पण माझं ते कामच होतं. “आपल्या कुठच्याही वस्तूला हात लावू द्यायचा नाही कोणालाही,” असं मम्मानं मला शिकवून ठेवलं होतं. त्यामुळे मी बऱ्याचदा तिच्या मागेमागे फिरायचो.

एकदा मला त्या काचेत एक कुत्राच दिसला. मी त्याच्याकडे रोखून पाहिलं तर तोही माझ्याकडे त्याच पद्धतीनं पाहात होता. ती कुत्री असती तर आवडलं असतं मला, एक नवीन मैत्रीण म्हणून. मी वास घेण्यासाठी त्या कुत्र्याच्या जवळ गेलो, पण माझं नाक त्या काचेलाच लागलं. कुत्र्याचा स्पर्श झालाच नाही. पण तो कुत्राच होता हे माझ्या लगेच लक्षात आलं. मी हळूच जीभ बाहेर काढली तर त्यानेही काढली. मी मम्मासारखं डावीकडे–उजवीकडे पाहिलं तर त्यानेही तेच केलं. मी माझा कान उजव्या पायाने खाजवून पहिला तर त्यानेही तेच केलं.

“नक्कीच ही भुताटकी आहे!” पण तो कुत्रा दिसायला उमदा आणि देखणा वाटला. भूत कसं दिसतं कोण जाणे! पण आमचा मकरंद दादा मला खूपदा भूत म्हणायचा. विशेषतः मी चिखलातून बाहेर येऊन बघायचो तेव्हा पिवळ्या फुलांचा सडा पडलेला असायचा, त्यात लोळून घरात आलो की, तो मला भूत म्हणायचा. गंमत म्हणजे मला मी कसा दिसतो ते माहीतच नव्हतं. त्यामुळे तो काचेतला कुत्रा भूत नसणार हे मी मनाशी नक्की केलं होतं.

मला त्या काचेत बघायचा नादच लागला. सारखं त्या काचेतल्या कुत्र्याबरोबर बसावंसं वाटू लागलं.

“ब्रान्डो, अगदी नार्सिसस झाला आहे हल्ली. सारखा आरशात बघत असतो.” मम्मा पप्पांना म्हणाली.

ते हसत म्हणाले, “तुझ्यावर गेलाय तो.”

मम्मा लगेच म्हणाली, “नाही हं, तो इंदूबाईंवर गेलाय. त्या सारख्या आरशात पाहात असतात. त्यांच्याकडूनच शिकलाय तो.”

त्यांचं हे बोलणं ऐकलं तेव्हा मला कळलं की, काचेला आरसा म्हणतात ते.

काही का म्हणेनात, मला तो आरशातला कुत्रा आवडला.

एक दिवस वेळ जात नव्हता म्हणून पुन्हा मी आरशासमोर जाऊन उभा राहिलो. आणि लगेच तो कुत्रा आलाच.

पण या वेळी मागे एक पक्षीही खिडकीवर



बसलेला दिसला. “अरेच्चा ! या दोघांची मैत्री झालेली दिसतेय !” माझ्या मनात आलं. मी माझ्या स्वभावाप्रमाणे त्या पक्ष्याला धरायला गेलो पण आरशावर आपटलो. पक्षी काही उडाला नाही. मी त्या कुत्र्यावरच आपटलो. थोडं नाकाला लागलं. त्यामुळे काही दिवस मी त्या आरशाचा नादच सोडून दिला.

परवाचीच गोष्ट.. मी नेहमीप्रमाणे गाडीतून फिरायला निघालो. भाजी घेऊन झाली. वाणसामान घेऊन झालं. आइसक्रीमसुद्धा खाऊन झालं आणि आमची गाडी एका दुकानापाशी थांबली. मम्मा मला गाडीत ठेवून, गाडीची खिडकी अर्धी उघडी ठेवून त्या दुकानात गेली. आणि मला ‘तो’ दिसला. काचेतून ‘तो’ मला दिसला. मी मान हलवून पाहिलं, पण त्याने मान नाही हलवली. मी जीभ काढून पाहिली, पण त्याने नाही काढली.

“अरेच्च्या ! हा काचेत आहे पण माझ्या आरशातल्या मित्रासारखा काहीच करत नाहीये.” माझ्या मनात आलं. मी मनात म्हटलं, “बघूनच येतो.” एकदा का माझ्या मनात आलं की मी ते करतोच, त्याच्या बऱ्यावाईट परिणामांचा विचार न करता.

त्याप्रमाणे मी धडपडत अर्ध्या खाली केलेल्या खिडकीच्या काचेतून बाहेर उडी मारली. रस्त्यात हाहाकार माजला पण माझ्यावर असल्या गोष्टींचा परिणाम होत नसतो. मी त्या दुकानात शिरलो आणि त्या काचेपलीकडच्या कुत्र्याजवळ जाऊन पोचलो. पण तो पठ्ठ्या मला शामळूच वाटला. नुसता उभाच होता.

*चित्र- अदिती पाध्ये-देसाई*



मी त्याला फाडून खाल्ला, पण ना त्याला मांस ना रक्त! एकदा घरात मी उशी फाडली होती तसंच काहीतरी बाहेर पडलं. एवढ्यात माझ्या मम्माचं लक्ष माझ्याकडे गेलं आणि ती धावत माझ्याकडे आली आणि माझ्या कॉलरला धरून तिने मला गाडीत नेऊन बसवलं. म्हणाली, "घरी जाऊन बघतेच तुला."

घरी गेल्यावर माझ्या कानावर पडलं की, माझ्यामुळे तिला त्या कुत्र्याचे पैसे द्यावे लागले. मी खजील झालो आणि माझ्या आरशातल्या मित्राला भेटायला गेलो. तो होता तिथे आरशात. मी जीभ बाहेर काढली. मान वळवली आणि त्यानेही ते सर्व केलं.

माझा मित्र तिथे होता हे पाहून मला आनंद झाला, पण थोडाच वेळ.

माझ्या मित्राच्या मागे होतं एक मांजर. आमच्या नजरा मिळाल्या आणि आवाज आला.

खळळळळळ्.......

आरसा फुटला. जमिनीवर सगळीकडे फक्त काचाच काचा. मांजर पळालं. पण सर्वांत वाईट गोष्ट म्हणजे माझा मित्रही पळाला. माझ्या पुढ्यात कपाळाला हात लावून उभे होते मम्मा, पप्पा आणि मकरंद दादा.

मी घाबरून उठलो आणि जो जाऊन बसलो पलंगाखाली, तो दुसऱ्या दिवशी जेवणासाठीच बाहेर आलो.

**–विद्या डेंगळे**
*Vidyadengle@gmail.com*

## चपखल

मराठी भाषा समृद्ध आहे. एकेका अर्थाचे अनेक शब्द तिच्यामध्ये आढळतात. त्यांच्या वापरामुळे लेखनातला तोचतोपणा कमी होतो. क्वचित कोठे त्यांच्यामध्ये सूक्ष्म भेद असेलही. असे किती शब्द तुम्हांला माहीत आहेत? खालील शब्दांसाठी असे काही प्रतिशब्द देऊ शकाल?

**–प्रतिभा गोपुजकर** | *gopujkars@hotmail.com* | *(ज्येष्ठ लेखिका)*

| | | |
|---|---|---|
| १ | हत्ती | |
| २ | झाड | |
| ३ | पाणी | |
| ४ | फूल | |
| ५ | सूर्य | |
| ६ | अपेक्षा | |

| | | |
|---|---|---|
| ७ | अलौकिक | |
| ८ | पृथ्वी | |
| ९ | डोळे | |
| १० | मार्ग | |
| ११ | उशीर | |
| १२ | ओघ | |

*चपखलची उत्तरं पान क्रमांक ४७ वर*

# हर प्रश्नाला असते उत्तर

रडून प्रश्न सुटत नाहीत
चिडून प्रश्न मिटत नाहीत,
हर कुलपाला आहे किल्ली
दूर कधीही नसते दिल्ली..
छळता पिडता तयार होते
घमघमणारे उत्तम अत्तर!
हर प्रश्नाला असते उत्तर!

अवघड थोडे असेल काही
अशक्य काही मुळीच नाही,
वात चिमुकली उजेड देते
काळोखातून पहाट होते..
खडकालाही फुटतो पान्हा
कातळ काळा असू दे फत्तर!
हर प्रश्नाला असते उत्तर!

आधी आपलं मन हारतं
मग हारतो कच्चा माणूस,
आधी आपलं मन मरतं
मग मरतो कच्चा माणूस..
जिंकायला नसते बंधन
साठी असू दे, असू दे सत्तर!
हर प्रश्नाला असते उत्तर!

पडायचं आणि घडायचं
घडोघडी घडत जायचं,
बारीकसारीक पराभवांनी
पराभूत नाही व्हायचं..
जगात दुसरा आणखी नाही
तुझ्याहुनी कुणीही बेहत्तर!
हर प्रश्नाला असते उत्तर!

सृष्टीलाही माहीत आहे
अंधार-उजेडाचा खेळ,
आपण साधायचा असतो
जय-पराजयाचा मेळ..
वेळ चांगली येतच असते
काळ कितीही असेल बदतर!
हर प्रश्नाला असते उत्तर!

नंदनवन हे जीवन आपले
जीवन म्हणजे नाही शिक्षा,
हासत खेळत द्यावी अशी ही
जीवन म्हणजे एक परीक्षा..
सोपे असू दे किंवा अवघड
प्रश्नांनाही करू निरुत्तर!
हर प्रश्नाला असते उत्तर!

नको करू तू आदळआपट
सदाच असते अनुकूलता,
ऊन-सावली खेळ असे हा
कधी तरीच ये प्रतिकूलता..
नशिबावर तू नको विसंबू
दैवाहूनही तू बलवत्तर!
हर प्रश्नाला असते उत्तर!

**-डॉ. सुरेश सावंत**
*sureshsawant2011@yahoo.com*

## फिनलंडची शाळा



# नाताळ बाबाचा उत्सव

**मी मूळची नाशिकची. आता फिनलंडमध्ये राहते. येथील शाळांचा अभ्यास करताना लक्षात आलेले वेगळेपण तुमच्यासमोर मांडते आहे..**

**गेले** वर्षभर या सदरातून आपण फिनलंडच्या शाळांबद्दल खूप गप्पा मारल्या, कारण फिनलंडची शाळा-पद्धती जगभर वाखाणली जात आहे.

फिनलंड आणखी एका गोष्टीसाठी जगप्रसिद्ध आहे. ती गोष्ट म्हणजे इथं राहणारा सांताक्लॉज अर्थात नाताळ बाबा! इथे ख्रिसमसचा सण खूपच दणक्यात साजरा होतो. सांताक्लॉज राहतो फिनलंडच्या उत्तरेकडे म्हणजे Lapland मध्ये. त्यातली वैशिष्ट्यपूर्ण जागा आहे आर्क्टिक सर्कल. आर्क्टिक सर्कल म्हणजे काय हे समजून घ्यायचं असेल तर भूगोलाची पुस्तकं उघडा पटापट आणि अक्षांश, रेखांश आणि कर्कवृत्त, मकरवृत्त समजून घ्या.

येथील रोवानिएमी (Rovaniemi) या शहरात 'सांताक्लॉज व्हिलेज' या नावाने एक पर्यटनस्थळ विकसित करण्यात आलं आहे. तिथे सांताक्लॉजचं घर, कार्यालय, पोस्ट ऑफिस अशा विविध वास्तू आहेत. 'सांताक्लॉज' ही एक रम्य कल्पना फिनलंडमध्ये साकार करण्यात आली. १९२७ सालापासून याची सुरुवात झाली आणि मग पुढे हे 'सांताक्लॉज व्हिलेज' वसवण्यात आलं.

दरवर्षी अक्षरशः लाखो लोक सांताक्लॉजला भेटायला फिनलंडला येतात. त्याच्याबद्दल सर्वांना उत्सुकता आणि प्रेम असतं. सांताक्लॉजला वेगवेगळ्या भाषा अवगत असतात, कारण विविध भाषिक पर्यटकांशी त्याने त्यांच्या त्यांच्या भाषेत संवाद साधला की त्यांना ते त्याच्या तोंडून ऐकायला भारी वाटतं. सांताक्लॉजला भेटायला वर्षभर लोक येत असतात. लाखो पत्रंसुद्धा येतात. तुम्हीसुद्धा सांताला पत्र पाठवू शकता बरं का ! कोण जाणे, त्याला कदाचित मराठीसुद्धा येत असेल.

ख्रिसमसच्या सणाचे वेध इथे नोव्हेंबरपासूनच लागतात. वेगवेगळ्या जाहिराती, सवलती, आकर्षक लायटिंगच्या माळा, वेगवेगळ्या आकारांचे, पांढरेशुभ्र किंवा हिरवे ख्रिसमस ट्री या सगळ्या सामानाने छोटी दुकानं आणि मोठ्ठे मॉल सगळं ओसंडून वाहात असतं. त्याबरोबरच शहराच्या मध्यवर्ती भागात खास ख्रिसमसच्या वस्तूंचा बाजार भरतो त्याला Joulutori म्हणतात. 'Joulu'

म्हणजे फिनिश भाषेत ख्रिसमस आणि ‘Tori’ म्हणजे बाजार. तर या ख्रिसमस बाजारात ख्रिसमस साजरा करण्यासाठी  लागणाऱ्या खास वस्तू, खाण्याचे पदार्थ, शोभेच्या वस्तू, शिवाय भेट म्हणून देता येतील अशा अनेक गोष्टींची छोटी छोटी दुकाने खास या दिवसांसाठी उभारली जातात. लोक आवर्जून या छोट्या दुकानांनासुद्धा भेट देऊन काहीबाही खरेदी करतात. या सगळ्यामागे, ही परंपरा जपण्याचाही उद्देश दिसतो.

इथे घरोघरी लोक आपल्या कुटुंबीयांबरोबर ख्रिसमस साजरा करतात. त्यासाठी घराची साफसफाई, रंगरंगोटी, आवश्यकतेनुसार नवीन फर्निचरची खरेदी अशा सगळ्या गोष्टी केल्या जातात. शिवाय एकमेकांना द्यायला खास भेटवस्तूही खरेदी केल्या जातात. त्या दिवशी जेवणाचे विशेष पदार्थ तयार केले जातात, ज्यात एक पदार्थ असतो रिसी पुरो म्हणजे तांदूळ आणि गाजर दुधात एकत्र शिजवून केलेली खीर. इतरही अनेक पदार्थ जसे की टर्की, karelian pie, केकही असतात, पण नैवेद्यासाठी तांदूळ-गाजराची खीर आवश्यकच.

ख्रिसमसच्या निमित्ताने सगळं कुटुंब एकत्र येतं. सुखदुःखाची देवाणघेवाण होते. एरवी






शिक्षणानिमित्त, कामानिमित वेगवेगळ्या ठिकाणी राहणारे कुटुंबीय या निमित्ताने एकमेकांना भेटतात. या देशात आयुर्मान चांगले लाभलेले वयोवृद्ध लोकही एकेकटे राहताना दिसतात. त्यांच्यासाठी ख्रिसमस म्हणजे आनंदाची बरसात असते.

आपल्याकडे दिवाळीची असते तशी इथल्या शाळेत ख्रिसमसची सुट्टी असते. सुट्टी लागण्यापूर्वी शाळेत ख्रिसमस कुकी बनवतात. शिवाय शाळेत ख्रिसमस पार्टी केली जाते. त्यावेळी इथे मिळणाऱ्या वेगवेगळ्या बेरी, सफरचंद, द्राक्षे, दालचिनी यापासून बनवलेले ग्लॉगी नावाचे सरबत पितात. ते इथले राष्ट्रीय पेयच आहे. त्याचप्रमाणे वर्गावर्गांतून ख्रिसमसची गाणी, नाच बसवले जातात आणि ते सादर केले जातात. पालकांना शाळेत बोलावून त्यांनाही या पार्टीत सहभागी करून घेतले जाते.

तुम्हांलाही ख्रिसमसच्या आणि येणाऱ्या नूतन वर्षाच्या शुभेच्छा! हे वार्षिक सदर इथे संपतेय. तुम्हांला फिनलंडच्या शाळा, इथली शिक्षणपद्धती याबद्दल कधी जाणून घ्यायचं असेल तर माझ्याशी जरूर संपर्क साधा.

**तुमची**
**शिरीनमावशी**
**(शिरीन कुलकर्णी)**
*shirin.heramb@gmail.com*



# पुरातन दगडोबा!

**बंगळूरूमध्ये दिसणाऱ्या एका पुरातन दगडोबाने मला अचंबित केलं. त्या दगडोबाची माहिती खणून काढली. फारच भारी! लालबागेतला हा राखाडी करडा खडक तब्बल तीन अब्ज वर्षं जुना आहे!**

**आपल्या** मेंदूचं काम वेगवेगळया संदर्भांच्या आधाराने सुरू असतं. त्यामुळे मुंबईत कुणी 'लालबाग' म्हटलं की गणपती आठवतो; तर बंगळूरू (बँगलोर) मधल्या 'लालबाग'चा अर्थ '२४० एकरांची खरीखुरी बाग' असा होतो!

माझी मुंबईहून बंगळूरूला बदली झाली तेव्हा घर ते ऑफिस जा-ये करताना मला दररोज लालबाग-दर्शन घडत असे. रस्त्याच्या कडेकडेनं सोबत करणारा दाट झाडोरा बागेच्या पूर्वेकडील प्रवेशद्वाराजवळ मात्र अचानकपणे विरळ व्हायचा आणि एक अखंड प्रचंड राखाडी खडक लागायचा. त्याचं एकंदरीत आकारमान पाहता त्याला 'एकदगडी टेकाड' म्हणणं योग्य ठरेल. टेकाडमाथ्यावरची चार कोरीव दगडी खांबांची देऊळवजा रचना लक्ष वेधून घ्यायची. या टेकाडावर सकाळच्या वेळी काही हौशी मंडळी रंगीबेरंगी चटया अंथरून योगासनं करताना दिसायची; तर संध्याकाळी शाळकरी मुलामुलींची टोळकी तिथे पकडापकडी खेळत असायची. 'ब्रिटिशपूर्व काळापासून जोपासण्यात आलेलं वनस्पती उद्यान (बोटॅनिकल गार्डन) म्हणून ख्याती कमावलेल्या लालबागेत हा भलामोठा दगडोबा कधी आणि कसा उगवला असावा? ..मला भलतं कुतूहल वाटायचं.

एका सुट्टीच्या दिवशी, सकाळी सकाळी, मी या विशालकाय खडकप्पांची भेट घ्यायला गेलो. आदल्या रात्री पाऊस पडून गेला होता. खडकाचा अजूनही ओला असलेला राखाडी पृष्ठभाग कोवळ्या सूर्यप्रकाशात चकाकत होता. दगडावर चढता यावं म्हणून अधेमधे पायऱ्यांची सोय केलेली होती. चढू लागलो तसं जाणवलं की, दगडाच्या

उताराच्या अंगानं बरेचसे उंचसखल पट्टे उमटलेले आहेत- वरून, आकाशातून पाहिलं तर चहूबाजूला पसरत असलेल्या दगडी लाटा भासाव्यात असं.. काही ठिकाणच्या पट्ट्यांमध्ये एक ते दीड वीत उंचीचं अंतर होतं, तर काही पट्टे अगदी पातळ पापुद्र्यांसारखे होते. काही भागांत करड्या पांढऱ्या रंगाच्या लांबचलांब रेघोट्या राखाडी दगडात चपखलपणे सामावल्यासारख्या दिसत होत्या. माथ्यावरच्या दगडी खांबांजवळची पाटी वाचल्यावर कळलं की, शोभिवंत कळस असलेला हा चौथरा म्हणजे कुणाचं मंदिर नसून एक टेहेळणी मनोरा आहे- सोळाव्या शतकातल्या केम्पेगौडा राजानं त्या काळच्या राजधानीभोवती उभारलेल्या चार मनोऱ्यांपैकी एक!

मनोऱ्याची माहिती मिळाली, पण त्याखालच्या खडकाचं काय? चढलो त्याच्या दुसऱ्या बाजूनं दगडी पायऱ्या आणि पट्टे. उतरलो तेव्हा दुसरं उत्तरदेखील मिळालं. तिथे भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षणानं (जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया-जीएसआय Geological Survey of India-GSI) लावलेल्या फलकावर माझ्या पायांखालच्या महाकाय पाषाणाला 'राष्ट्रीय भूवैज्ञानिक स्मारक' म्हणून घोषित केलेलं होतं. इतक्या श्रेष्ठ कौतुकाचं कारण होतं या दगडजींचं ज्येष्ठपण! 'लालबागेतला हा राखाडी करडा खडक तब्बल तीन अब्ज वर्षं जुना असून भूवैज्ञानिक भाषेत त्याला पेनिन्सुलर (द्वीपकल्पीय) नाईस (Peninsular Gneiss) म्हणतात.' असं त्या फलकानं मला सांगितलं.

'पेनिन्सुलर नाईस' या नव्या संज्ञेबद्दल अधिक तपशील मिळवण्यासाठी मी इंटरनेटची मदत घेतली. योगायोगानं त्याच सुमारास (प्रणय लाल यांचं) 'इंडिका' नावाचं पुस्तक हाती आलं. त्यातून



लालबागच्या 'नाईस'ची पूर्वकहाणी अगदी विस्तृतपणे कळली. पुढे हौसेखातर म्हणून एका भूवैज्ञानिक अभ्याससहलीत सहभागी झालो, तेव्हा आणखी काही शास्त्रीय संदर्भांची जोड मिळाली.

एकूण गोष्ट समजली ती अशीः ४.५६७ अब्ज वर्षांपूर्वी जेव्हा पृथ्वी जन्माला आली तेव्हा तिच्यावर आत्ता आहे तशी जमीन नव्हती. पृथ्वीच्या केंद्राभोवतीचे अतिउष्ण मॅग्मा आणि लाव्हारस जसजसे थंडावत गेले, तसतसे जमिनीचे अनियमित आकारांचे तुकडे आकारास येऊ लागले. मात्र ही प्रक्रिया एकसंध नव्हती. हे ताजे भूस्तर आलटून पालटून पुन्हा वितळायचे आणि थंड व्हायचे. थोडं पक्कं झालेलं भूस्तर लाव्हावर तरंगता तरंगता एकमेकांवर सरकायचं, आपटायचं. परिणामी त्यांच्या संरचनांमध्ये सततच बदल घडत असायचे.

सुमारे ३.५ ते ३.२ अब्ज वर्षांदरम्यान मात्र जमिनीच्या आवरणाचे काही असे तुकडे अस्तित्वात आले, ज्यांच्यात आजवर निर्माण झालेल्या इतर भूखंडाच्या तुलनेत क्वचितच काही बदल घडले आहेत. अशा सर्वाधिक जुन्या आणि स्थिर महाखडकांना भूवैज्ञानिकांनी 'क्रेटन' (Craton) असं नाव दिलं आहे. यापैकी एक क्रेटन बंगळूरूजवळच्या नंदी हिल्स टेकड्यांच्या रूपानं पाहायला मिळतो. या क्रेटनच्या भौगोलिक विस्तारावरून त्याला 'धारवाड किंवा कर्नाटक क्रेटन' म्हटलं जातं. क्रेटन्सच्या आसपासचे जुने दगड वितळून जर प्रचंड दाबाखाली थंड झालं, तर त्यांच्यातील खनिजांची वेगवेगळ्या थरांमध्ये विभागणी होत जाते आणि नाईस प्रकारचा खडक तयार होतो. धारवाड क्रेटनवर ही प्रक्रिया घडली व त्यातून लालबागच्या पेनिन्सुलर नाईसची निर्मिती झाली. भूवैज्ञानिक कालमापनानुसार लालबागची नाईस धारवाड क्रेटनपेक्षा अर्ध्या-पाऊण अब्ज वर्षांनी तरुण जरी असली तरी क्रेटनच्या बरोबरीनं तीदेखील पृथ्वीवरील अगणित घडामोडींची स्थितप्रज्ञ साक्षीदार आहे. धारवाड क्रेटनच्या सोबतीनं तिनं भारतीय उपखंडाचा दक्षिणेकडचा भूभाग घट्ट धरून ठेवला आहे.

माझ्या डोक्यातल्या 'लालबाग' या ठिकाणाला आता हे सर्व तपशील जोडले गेले आहेत. आता मला पेनिन्सुलर नाईसच्या आकारमानाचा अचंबा वाटत नाही. उलट तिच्या अघळपघळ अस्तित्वाचं अप्रूप वाटतं... कोण्या एके काळी हिने पहिलेवहिले जीवजंतू जोपासले असतील... पुढच्या काळात प्रकटलेले डायनासोरसचे समकालीन पशुपक्षीसुद्धा हिच्यावर वावरले असतील... अगदी अलीकडे जेमतेम चार शतकांपूर्वी टिपू सुलतानाच्या फौजेने ही नाईस कितीदातरी ओलांडली असेल... गेल्या दोन शतकांमध्ये किती आणि कोणकोणत्या नियतकालिकांमध्ये हिच्याबद्दल लिहिलं गेलं असेल.. ऑफिसला जाता-येताना नाईस दिसली की मनातल्या मनात अशी उत्क्रांतीची उजळणी होते. आपोआपच स्वतःच्या आयुष्याचा आणि अस्तित्वाचा खुजेपणा जाणवतो. आजूबाजूच्या निसर्गाशी आणि संस्कृतीशी असलेली आपली एकरूपता अधोरेखित होऊ लागते.

**–प्रसाद सांडभोर**
*sandbhorprasad@gmail.com*

**भारतातील इतर विशेष भूवैज्ञानिक स्थळांची माहिती वाचण्यासाठी-** *https://www.gsi.gov.in/webcenter*

**'इंडिका' या पुस्तकाची इंग्रजी किंवा मराठी आवृत्ती तसेच 'दगडधोंडे' हे नंदा खरे यांचे पुस्तक जरूर वाचा.**






# आपण चॉकलेट का खातो?

**‘असावा सुंदर चॉकलेटचा बंगला’**

लहानपणी हे गाणं नुसतं ऐकतानासुद्धा तोंडाला पाणी सुटायचं. लहानथोर सगळ्यांना सर्वांत अधिक खावाखावासा वाटणारा गोड खाऊ म्हणजे चॉकलेट! अठराव्या शतकात त्याचं शास्त्रोक्त बारसं झालं, तेव्हा शास्त्रज्ञांनी त्याचं नाव ‘थिओब्रोमा’ म्हणजे ‘देवांचं अन्न’ असं ठेवलं. इतकं काय आहे त्या चॉकलेटात?

चॉकलेट खाऊन ‘बरंऽऽ’ वाटतं. तसं ‘बरंऽऽ’ वाटायला लावणारा चॉकलेटातला सगळ्यात महत्त्वाचा घटक म्हणजे साखर.

गोड खाल्लं की मेंदू स्वतःचीच पाठ थोपटून घेतो. मेंदूमध्ये शाबासकी देणारी, आनंददायी रसायनं तयार होतात. डोपामीन हे त्यांच्यातलंच एक. तशी शाबासकी पुन्हा पुन्हा मिळावी म्हणून मेंदूला अधिक गोड खायचा मोह अनावर होतो.

गोड खाल्ल्यावर मेंदूत बनणारं आणखी एक रसायन म्हणजे ‘आनंद-अमाईड’, The Molecule of Bliss! गांजा, चरस, भांग घेतल्यावर जी ब्रह्मानंदी टाळी लागते तो झिंगवणारा आनंद त्या आनंद-अमाईडने होतो. पण तो अगदी थोडाच वेळ टिकतो. तोच आनंद पुन्हा पुन्हा मिळावा म्हणून व्यसनी लोक पुन्हा पुन्हा ते अमली पदार्थ घेत राहातात. अगदी त्याच कारणाने, तश्शाच ओढीने आपण चॉकलेटची वडीमागून वडी खात राहातो. चॉकलेट जितकं अधिक गोड तितकी ती खाखा



Chocolate contains the compound anandamide, which actually stimulates the human brain the same way as marijuana.

अधिक असते.

फळं, दूध, मध हे पौष्टिक अन्नपदार्थ गोड लागतात. म्हणून माणसाच्या मेंदूने 'गोड' ही चांगल्या, पौष्टिक अन्नाची चव अशी खूणगाठच बांधली आहे. ही खूणगाठ केव्हा बांधली? अगदी पृथ्वीवर माणूसजात निर्माण झाली तेव्हाच, दीड लाख वर्षांपूर्वी! आदिमानवाच्या काळात पौष्टिक अन्न मिळवायला वणवण करावी लागे. 'पुढचा खाण्याजोगा घास कधी मिळेल कोण जाणे!' अशी स्थिती असायची. त्या भटकंतीत पौष्टिक खाणं सापडलं तर ते जेवढं मिळेल तेवढं बकाबका खाऊन घेणं गरजेचं असायचं. ते अत्यावश्यक काम नीट पार पडावं म्हणून निसर्गाने गोड चवीची पारख करणारे मज्जातंतू फक्त जिभेपुरतेच न ठेवता त्यांना जठरात, आतड्यांतदेखील विखरून ठेवलं. म्हणून गोड खाऊ खाल्ला की ते मज्जातंतू तशा सगळ्या ठिकाणांहून मेंदूवर 'खा, खा' या संदेशांचा भडिमार करतात. खरं तर एकविसाव्या शतकात हवं तेव्हा पुरेसं अन्न सहज मिळतं; पण मज्जातंतू ती जुनी साठवणीची रीत अजूनही पाळतात. म्हणूनच गोड खाऊ खाल्ला की खाखा सुटते.


लाडू, जिलबी, गुलाबजाम हेदेखील गोडच पदार्थ! हे पदार्थ भरमसाट खाल्ले जातात ते फक्त लग्नाच्या पंगतीत पैज जिंकण्यासाठीच! एरवी नाही. मग चॉकलेट खायचा सपाटा का लागतो? शिवाय चॉकलेट गोड असतं ते आता! पण सुमारे पंचवीसशे वर्षांपूर्वी, अमेरिकेतल्या माया संस्कृतीतले लोक कडू कोकोबिया, तिखट मिरच्या आणि बेचव मक्याचं पीठ पाण्यात मिसळून, उकळून, घुसळून फेसाळ पेय बनवत. त्याचं नाव होतं, 'xocolatl' (झॉकलेटल) म्हणजे 'कडू पाणी'! मायन लोक ते रसायन त्यांच्या समारंभांत देवाचं पेय म्हणून चाखतमाखत चवीचवीने पीत. नंतरच्या ॲझ्टेक संस्कृतीनेही मायन लोकांकडून ते कडू देवपेय हट्टाने घेतलं. स्पॅनिशांनी ते युरोपात नेलं.

चॉकलेटला दूधसाखरेचा साज चढला तो युरोपात पोचल्यानंतर! मग त्या कडू मायन सोमरसात इतकं आवडण्याजोगं होतं तरी काय?

चॉकलेटात तीनशेहून अधिक रासायनिक पदार्थ असतात. त्यांच्यातले देवांशी नातं जोडणारे नेमके कोणकोणते, ते शास्त्रज्ञ शोधताहेत.

बिनसाखरेच्या, कडू 'xocolatl' मधले काही घटक मेंदूत मॉर्फीनसारखं काम करतात. शिवाय त्याच्यात थोड्या प्रमाणात का होईना, आनंद-अमाईड असतं. आणि काही अमायनो ॲसिड्स (प्रोटीनचे घटक) असतात. त्यांच्यापासून मेंदूतली सुखदायक, उत्साहवर्धक रसायनं बनतात. त्या साऱ्यांचीही जोराची तलफ येते. त्या प्राचीन मायन लोकांना त्यांचं 'कडू पाणी' देवांचं अन्न वाटायचं ते त्याचमुळे!

त्याच्याशिवाय त्या कडू पाण्यात, कॉफीत





असतं ते कॅफीन आणि त्याचा धाकटा, थोडा कमकुवत भाऊ theobromine हेही असायचं. त्या दोघांनीही तरतरी येते. Theobromineमुळे कॅन्सर, दमा, हृदयाचे आजार यांचं प्रमाण घटतं. स्मरणशक्ती वाढते, रक्तातलं वाईट कोलेस्टेरॉल कमी होतं आणि चांगलं कोलेस्टेरॉल वाढतं. ती दोन्ही गुणी भाऊ-रसायनं अमेरिकेच्या मूळ सोमरसात अधिक असली तरी आजच्या चॉकलेटात कमीच असतात. केवळ ते फायदे मिळवायला चॉकलेट खाण्यात अर्थ नाही.

हल्ली चॉकलेट मुबलक मिळतं, ते खाऊन वजन वाढतं, त्याचे दुष्परिणाम होतात. म्हणून चॉकलेटची खाखा सुटली की आनंद-अमाईड मिळवायचे दुसरे मार्ग शोधायचे. व्यायाम, ध्यान, योगासनं यांनी मेंदूतलं आनंद-अमाईडचं प्रमाण वाढतं. चॉकलेटची ओढ लागली की पंधरा-वीस मिनिटं तरातरा चालून किंवा वेगाने धावून यावं. जमतील ती योगासनं करावी, मेडिटेशन करावं. दर वेळी तसा उपाय केला की ती ओढ अनावर होत नाही.

याचा अर्थ चॉकलेट खायचंच नाही असा मुळीच नाही. परीक्षेच्या मध्यावरची भूक, वाढदिवसाचं सेलिब्रेशन, दोस्तांची मैफिल यांना चॉकलेट हवंच. आणि दोस्ताशी कट्टीची बट्टी करायची असली की तर चॉकलेटच हवं. खरं ना?

**-डॉ. उज्ज्वला दळवी**
*ujjwalahd9@gmail.com*
*(वैद्यकतज्ज्ञ व नामवंत साहित्यिक)*

## वेचक-रोचक

**अनोखे ग्रंथालय-** हे आहेत पी.व्ही. चिन्नाथंबी. केरळच्या इडुक्की जिल्ह्यातील जंगलातील एका आदिवासी ग्रामीण भागात ते स्वतःच्याच झोपडीवजा घरातून एकमेव असं ग्रंथालय चालवतात. या ग्रंथालयात एकूण १६० पुस्तके आहेत- सर्वच्या सर्व क्लासिक्स. विशेष म्हणजे या भागातील लोकांकडून ही पुस्तकं नियमितपणे वाचण्यासाठी उधार घेतली जातात, वाचली जातात आणि अत्यंत गरिबीत जगत असणाऱ्या मुथावन जातीच्या या आदिवासी माणसाकरवी ती प्रामाणिकपणे परतही आणून दिली जातात. पी.व्ही. चिन्नाथंबी यांच्या पुस्तकप्रेमाने व ग्रंथालयाने अतिदुर्गम आदिवासी लोकांच्या शिक्षणाचा व वाचनाचा छंद जोपासण्यासाठी केलेला हा प्रयत्न कौतुकास्पद आहेत.



**-मेघना जोशी** | *joshimeghana.23@gmail.com* | *(शिक्षणतज्ज्ञ)*

# Hide & Seek

Illustrated by Juilee Mahimkar



Some objects are playing hide & seek on the page above, can you find them?




## Can you spot the 10 differences in the pictures below?





सहज शोध

पेन्सिलींचेही वेगळे विश्व आहे. या पेन्सिलींना घर म्हणजे आपला पेन्सिल बॉक्स किंवा पेन्सिल केस वापरण्याची प्रथा कधीपासून पडली असेल? जाणून घेऊया याविषयी–



# पेन्सिलींसाठी घर, महाल!

**शाळेत** रोज लागणारी पेन्सिल! किती वेगवेगळ्या प्रकारच्या पेन्सिल / पेन्सिली (हा खास आपला शाळेतला शब्द असतो!) वापरतो नं? रंगीबेरंगी, वेगवेगळ्या वापरासाठी वेगळ्या! कधी फक्त लिहायला वेगळी, कधी फिकट चित्र काढायला वेगळी, डार्क काळी डायग्रामसाठी, कधी स्केच काढायला! केवढे अफाट विश्व आहे हे पेन्सिलींचे! या पेन्सिलींना घर म्हणजे आपला 'पेन्सिल बॉक्स' किंवा 'पेन्सिल केस' वापरण्याची प्रथा कधीपासून पडली असेल?

मूळ जर्मनीचा फॅबर-कॅसल हा उत्तम पेन्सिलींचा ब्रँड तुम्हांला माहिती असेल. सन १७०० ते १८०० दरम्यान जर्मनीत फॅबर कुटुंबीयांनी पेन्सिली तयार करायला सुरुवात केली. खाणीतून निघणारे ग्राफाइट आपल्या कंपनीला मिळावे म्हणून अनेक ठिकाणी या कुटुंबाने फिरस्ती केली आणि उत्तम दर्जाच्या पेन्सिलींचे उत्पादन करत राहिले. पेन्सिल टेबलवरून घरंगळत चटकन खाली पडू नये, म्हणून षट्कोनी आकाराची पेन्सिल तयार करण्याची कल्पना त्यांनी राबवली. लोथर वोन फॅबर यांनी १८०० साली आपल्या आजोबांनी सुरू केलेली ही कंपनी जेव्हा स्वतः मालक म्हणून चालवायला घेतली, तेव्हा त्यांनी अनेक गोष्टींचा विचार केला. पॅकेजिंग, प्रेझेन्टेशनला महत्त्व दिले. आपल्या पेन्सिली अतिशय सुंदर अशा हॅन्डमेड बॉक्समध्ये ठेवून स्वतःसोबत मिरवायला सुरुवात केली! कधी


चांदीचे, तर कधी हस्तिदंती अशा अनेक आकर्षक बॉक्समध्ये पेन्सिली ठेवून ते युरोपात प्रवास करत, तेव्हा पेन्सिल बॉक्स बाळगणे हा चक्क प्रतिष्ठेचा भाग झाला! फॅबर हे असे पेन्सिल बॉक्सचे जनक असावेत. मात्र त्यांनी या बॉक्सेसचे पेटंट काही घेतले नव्हते.



पेन्सिल बॉक्स व्यावसायिकरित्या तयार करण्याचे श्रेय फॅबर यांना न जाता अमेरिकेच्या वेनोरा पर्ल अमोथ यांना जाते. टोकदार पेन्सिलीमुळे कधी कपड्याला छिद्रे पडतात. आणि कधी कधी टोकदार पेन्सिलीमुळे कुणाला इजा होते. हे टाळण्यासाठी वेनोरा यांनी सहा पेन्सिल मावतील असा उभा बॉक्स तयार केला. अनेक प्रकारचे आकर्षक बॉक्स त्यांनी तयार केले आणि १९४६ साली पेन्सिल बॉक्सचे पेटंट घेतले. त्यानंतर जगभर पेन्सिल, पेन, रबर, शार्पनर अशी स्टेशनरी ठेवण्याचे विविध प्रकारचे पाऊच तयार होऊ लागले. ते प्रचंड लोकप्रिय झाले. पुढे गंमत अशी की, फॅबर-कॅसल कंपनीने या सगळ्यावर कडी करत ड्रॉवर असलेले पेन्सिलचे बॉक्स, पेन्सिलींची छोटी सुंदर ब्रीफकेस अशा वस्तूंची निर्मिती करत त्याचे पेटंट घेतले. आणि रंगीबेरंगी पेन्सिलींसाठी घरे, जणू महाल निर्माण केले.

कुणाला टोक लागू नये म्हणून वेनोराने तयार केलेले पेन्सिल बॉक्स आणि पेन्सिलींना प्रतिष्ठा देण्यासाठी फॅबरने बनवलेले आकर्षक बॉक्स या दोन्हींचा परिपाक म्हणजे आपले आजचे पेन्सिल बॉक्स! आहे ना गंमत?

**-सोनाली कोलारकर-सोनार**
*sonalisk73@gmail.com*
*(ज्येष्ठ पत्रकार)*





**या छोट्याशा मनीमाऊला तिच्या आवडत्या खाऊच्या भांड्यापर्यंत पोहोचण्यासाठी मदत करा.**

नक्की वाचा!

# ‘पर्सी जॅक्सन’ : एकविसाव्या शतकात ग्रीक दैवतांबरोबर!

**‘हॅरी** पॉटर’च्या कादंबऱ्यांनी लहानथोर सगळ्या वाचकांना झपाटून टाकलं, तसं रिक रायॉर्डन यांनाही खूप प्रभावित केलं. रिक रायॉर्डन हे मूळचे हाडाचे शिक्षक. अकरा ते चौदा या अगदी संवेदनशील असणाऱ्या वयोगटाच्या मुलांना शिकवणं हे त्यांचं आवडीचं काम. एरवी काहीही वाचायचा कंटाळा करणारी मुलं ‘हॅरी पॉटर’ इतक्या उत्सुकतेनं का वाचतात, ते त्यांना समजत होतं, याचं कारण त्यांचा स्वतःचा अनुभव. त्यांनाही लहानपणी वाचायचा आळस होता, पण ‘लॉर्ड ऑफ द रिंग्ज’ ही अद्भुत कादंबरी वाचल्यावर त्यांचं पुस्तकांवर प्रेमच बसलं! ‘द गार्डियन’ या नियतकालिकासाठी सॅली विल्यम्स यांना दिलेल्या मुलाखतीत त्यांनी आणखी एक गोष्ट सांगितली आहे. त्यांचा मुलगा हेली लहान असताना त्यालाही वाचनाचा अगदी तिटकारा होता. ‘डिसलेक्सिया’ म्हणजे ‘शब्द नीटसे लक्षात न येणं’, आणि ‘ADHD’ (Attention Deficit Hyperactivity Disorder) म्हणजे ‘अतिचंचलता’ अशा दोन उपजत अडचणी त्याला होत्या. पण त्याला ग्रीक पुराणातल्या साहसकथा ऐकायला मात्र खूप आवडायचं. त्या बऱ्याचशा ऐकून झाल्यावर, आता पुढे काय असा प्रश्न आला.




तेव्हा त्याने आपल्या वडलांना विचारलं, “तुम्हीच आता अशा नव्या गोष्टी मनाने रचून का सांगत नाही?” अशा प्रकारे ‘पर्सी जॅक्सन’च्या गोष्टींना सुरुवात झाली.

# नेट-Key-भाषा

**‘गूगल ट्रान्सलेट’सारखी ॲप्स वापरून आपण जगातल्या अनेक भाषांमध्ये भाषांतर करून घेऊ शकतो, हे तुम्हांला माहीत आहे. पण त्या वेळी एक गंमत होते. म्हणजे पहा हं, मला 'Thank you.' या एका उपयोगी वाक्याचं मराठी, हिंदी, फ्रेंच, तमिळ, ग्रीक, कोरियन भाषांत भाषांतर करून हवं होतं. ते मला असं मिळालं..**

**धन्यवाद** (मराठी), **धन्यवाद** (हिंदी), **Merci** (French), **நன்றி நன்றி** (तमिळ), **Σας ευχαριστώ** (Greek), 감사합니다 (कोरियन), **شكرا لك لك** (अरेबिक).

**पहिली तीन ठीक होती, पण बाकी भाषांतरं मिळून तरी काय उपयोग? त्या भाषांची लिपी कुठे समजते आहे? भाषा आणि तिची लिपी दोन्ही यायला हवं ना? मराठी, हिंदीसाठी देवनागरी, इंग्रजीसाठी रोमन, वगैरे. सुदैवाने भाषांतरासारखं लिप्यंतर पण करून मिळतं. म्हणजे दुसऱ्या भाषेच्या लिपीतला मजकूर आपल्या सोयीच्या लिपीत घेता येतो. तो मला असा मिळाला होता-**

shukran lika., Nan̠r̠i., gamsahabnida., Sas efcharistó.

**आता रोमन अक्षरांत दिलेला हा मजकूर प्रत्येकी कोणत्या भाषेतला आहे, तुम्ही ओळखू शकता का? (मी क्रम बदलला आहे.) नाहीच जमलं, तर गूगल ट्रान्सलेट ॲप आहेच मदतीला!**

रिक रायॉर्डन यांच्या अनेक कादंबऱ्यांचा, कथांचा नायक ‘पर्सी जॅक्सन’ हा नेमका कोण आहे? तर न्यूयॉर्क शहरात राहणारा, एक बारा वर्षांचा, सहाव्या इयत्तेतला मुलगा. रिक रायॉर्डन यांच्या हेलीसारखाच अतिचंचल, नको तिथे धडपडून अपघात, अडचणी, संकटात सापडणारा, शब्दांचं स्पेलिंग नीट वाचता न येणारा. सहावीत येईपर्यंतच्या सहा वर्षांत त्याला सहा शाळा बदलाव्या लागल्या आहेत. पण त्याची आई त्याच्यावर रागावत नाही. पर्सीची आणि त्याच्या खऱ्या वडिलांची त्याच्या जन्मापूर्वीच ताटातूट झाली आहे आणि सावत्र वडील त्याला फार दुष्टपणाने वागवतात. त्याला मित्रही फारसे नाहीत. आपलं आयुष्य असंच सगळ्यांची बोलणी खात, अपमान सहन करत जाणार असं पर्सीला वाटलं, तर नवल नाही. पण तो सहाव्या इयत्तेत असताना मात्र त्याचं आयुष्य पार बदलून जाईल अशा काही घटना वेगाने घडू लागल्या. शाळेची सहल एका संग्रहालयात गेलेली असताना गणिताच्या शिक्षिकेच्या रूपात आलेल्या एका भयंकर प्राण्याने पर्सीला एकटं गाठून त्याच्यावर हल्ला केला. त्यात पर्सी ठार मेलाच असता खरं तर, पण तितक्यात त्याचे दुसरे शिक्षक

तिथे पोचले, त्यांनी एक पेन पर्सीकडे टाकलं – नाही, पेन नाही, पर्सीच्या हातात त्याची एक तळपती तलवार झाली. त्या तलवारीचा वार बसताच त्या भयंकर प्राण्याचं भस्म झालं आणि हवेत विरून गेलं. आपल्या आसपास दिसतं त्यातलं खरं काय, खोटं काय, हेच पर्सीला कळेना.

'पर्सी जॅक्सन अँड द लाइटनिंग थीफ' ही 'पर्सी जॅक्सन' मालिकेतली पहिली कादंबरी जसजशी पुढे सरकते, तसतसा पर्सीबरोबर वाचकांना देखील सगळ्या गोष्टींचा उलगडा होतो. ग्रीक देवदेवतांच्या आणि वीरांच्या गोष्टी बऱ्याचशा काल्पनिक आहेत, असं आपण समजतो. पण या कादंबऱ्यांमधल्या जगात मात्र त्या खऱ्याच घडून गेल्या आहेत. इतकंच नाही, तर आजही त्या ग्रीक देवदेवता आणि त्यांच्याशी संबंधित इतर अतिमानवी, अमर व्यक्ती –महाकाय राक्षस, अतिप्रचंड ताकद आणि दैवी शक्ती मिळालेले विचित्र पक्षी, प्राणी- पाश्चिमात्य जगात वावरत आहेत. सत्ता आणि सुबत्ता यांचं केंद्र बदलल्यामुळे आता त्यांच्या निवासाची जागा बदलली आहे, इतकंच. 'माऊंट ऑलिंपस' ही त्यांच्या मुक्कामाची जागा त्यांनी आता अमेरिकेत हलवली आहे. सामान्य माणसाला ही मंडळी वेगळी ओळखू येत नाहीत, पण ती मर्त्य माणसांच्या जगात फिरत असतात. त्यांना वाटलं, तर ती माणसांशी बोलतात, नातं जोडतात. पर्सीची आई सामान्य जगातली असली, तरी समुद्राचा, जलशक्तीचा अधिपती पसायडन हा त्याचा खरा पिता आहे. पर्सीला माहीत नसलं, तरी त्याच्या स्वतःच्या अंगी दैवी अंश आहे. त्याची अतिचंचलता त्यातूनच उद्भवली आहे. त्याला उपजत येणारी भाषा म्हणजे पुरातन ग्रीक, म्हणून तर त्याला इंग्रजी स्पेलिंग वाचताना त्रास होतो!

आपल्याकडे जसे इंद्रादी देवतांचे आपसात हेवेदावे असतात, भांडणं असतात, तशीच ग्रीक देवांच्यातही असतात. शिवाय दुष्ट शक्तींपासून असणारा धोका वेगळाच! त्याची झळ पर्सीला लागू नये, म्हणून त्याच्या आईने खूप प्रयत्न केले आहेत, आणि त्याच्या जन्माचं रहस्य त्याला कळू दिलेलं नाही. पण आता मात्र ते लपून राहणं शक्य नाही. पर्सीला तो खरा कोण आहे, हे कसं कळलं; तो ग्रीक देवदेवतांच्या या आधुनिक जगात कसा गेला; तिथे त्याच्यावर कोणती संकटं आली; तो त्यांच्याशी कसा लढला; त्याने स्वतःलाच नाही, तर इतरांनाही कसं वाचवलं अशा एकाहून एक सरस कथा 'पर्सी जॅक्सन' या कादंबरीमालेत आपल्याला वाचायला मिळतात. एखाद्या ॲक्शन किंवा थ्रीलर सिनेमाप्रमाणे त्यात सतत वेगवान घडामोडी होत असतात, आणि अनेकदा एकदम अनपेक्षित वळणं येतात. ती मुळातून वाचण्यातच मजा आहे.

'हॅरी पॉटर'नंतर 'पर्सी जॅक्सन' वाचणं हे थोडं दुधाची तहान ताकावर भागवण्यासारखं आहे खरं, पण त्या निमित्ताने ग्रीक पुराणकथांची ओळख होते, हा एक फायदा आहे. त्या मूळ कथा अगदी रंजक स्वरूपात वाचायच्या असतील, तर जुन्या काळातले एक अमेरिकन लेखक नथॅनिएल हॉथॉर्न यांची 'अ वंडर बुक फॉर गर्ल्स अँड बॉईज्' आणि 'टँगलवुड टेल्स' ही पुस्तकं जरूर वाचा. आपल्याकडेही असं एखादं जग असेल, अशी नुसती कल्पना करायची झाली, तर ते कसं असेल बरं? तुम्हांला सुचते का अशी एखादी गोष्ट?

**–धनवंती हर्डीकर**
*dhanavanti@gmail.com*
*(शिक्षणतज्ज्ञ)*

निसर्ग नवल

**सस्तन प्राण्यांमध्ये आई आपल्या बछड्यांची काळजी अगदी प्राणपणाने घेताना पाहायला मिळते. मात्र संपूर्ण प्राणीसृष्टीतील, सरसकट सगळ्या प्राण्यांमध्ये अशा रीतीने प्रेम व्यक्त केले जातेच असे नाही. आईच्या वात्सल्याचे पदर किती प्रकारचे असतात, बघा!**

# चित्त त्यांचे पिल्लांपाशी!



किंग कोब्रा अंड्याचे रक्षण करताना

***'घार हिंडते आकाशी,***
***चित्त तिचे पिल्लापाशी'***

निसर्गातील मातृत्वाचे, वात्सल्याचे अचूक वर्णन या ओळीत केलेले आहे. मात्र ही वात्सल्याची भावना प्राणीसृष्टीत, सरसकट सगळ्या प्राण्यांमध्ये पाहायला मिळते का? या प्रश्नाचं उत्तर पूर्णपणे 'हो' असं देता येत नाही, कारण सस्तन प्राणी आणि पक्षी यांच्यामध्ये वात्सल्याची भावना जितकी तीव्र असते, तितकी ती अन्य प्राण्यांमध्ये म्हणजे रेप्टाइल्स किंवा कीटकांमध्ये पाहायला मिळत नाही. पक्ष्यांमध्ये सर्वसाधारणपणे नर आणि मादी मिळून अंड्यांची काळजी घेताना व पिल्लांना वाढवताना दिसतात. चिमुकल्या सनबर्डपासून ते गरुड-ससाणे अशा शिकारी पक्ष्यांपर्यंत सगळेच पक्षी आपल्या पिल्लांची देखभाल करतात. अंटार्क्टिका खंडाचे रहिवासी असलेले पेंग्विन पक्षीही नर आणि मादी मिळून अंडी उबवतात. फक्त एम्परर पेंग्विन्समध्ये मात्र ही जबाबदारी नर एकटे पार पाडतात. अंड्यातून पिल्ले बाहेर आली की आई पेंग्विन दूरवर जाऊन समुद्रातून मासे पकडून आणते आणि घरट्यापाशी आल्यावर आपल्या गळ्यात साठवलेले, अर्धवट चावलेले मासे पिल्लांना भरवते.

पक्ष्यांच्या अगदी विरुद्ध वागणे कासवांमध्ये



कुंभार माशी आणि तिचं घर

पाहायला मिळते. समुद्रातील ऑलिव्ह रिडले जातीची कासवं किनाऱ्यावर येऊन वाळूत खड्डा खोदून अंडी घालतात आणि त्यावर वाळू सारून परत समुद्रात निघून जातात. मग सुमारे ४५ ते ५१ दिवसांमध्ये ती वाळूतली अंडी नैसर्गिकरित्या उबतात आणि त्यातून पिल्लं बाहेर येऊन ती समुद्रात निघून जातात. रेप्टाइल्सच्या गटातील 'किंग कोब्रा' या एकाच सापाची मादी आपल्या अंड्यांचे संरक्षण करायला अंड्यांजवळ थांबते. बाकीचे साप एखाद्या ढोलीत, जमिनीतल्या खड्ड्यात आपली अंडी घालून निघून जातात. किंग कोब्राची मादी मात्र एखाद्या झाडाच्या बुंध्यालगत सुमारे ५५ इंच व्यासाचे पानांचे घरटे तयार करते आणि त्यात एकावेळी ३०-४० अंडी घालते. पुढे सुमारे ५०-६० दिवस ती या अंड्याभोवती वेटोळे घालून बसलेली असते. दिवसातून एक-दोन वेळा फक्त ती पाणी प्यायला जाते. हळूहळू अंड्यातून पिल्लं बाहेर येऊ लागली की मगच ती घरट्याचा ताबा सोडते.

कीटकांमध्ये तर त्यांचं आयुष्यच इतकं अल्प असतं की आपली पुढची पिढी पाहायला ते जिवंतच नसतात. फुलपाखरे, माशा, नाकतोडे, ढालकिडे हे सगळेजण अंडी घातल्यानंतर मरून जातात. मात्र यांच्या गटातली कुंभार माशी (पॉटर वास्प) अशी असते की, जी तिच्या नैसर्गिक कलेचा उपयोग आपल्या जन्माला येणाऱ्या पिल्लांच्या संगोपनासाठी करते. कुंभारमाशी आपल्या अंड्यांसाठी माती गोळा करून ती स्वतःच्या लाळेत भिजवून त्याचं सुबकसं मडक्याच्या आकाराचं घरटं तयार करते. हे मडकं जमिनीलगत, भिंतीवर, लाकडाच्या ओंडक्यावर पटकन दिसणार नाही अशा ठिकाणी असतं. याच मडक्यात ती आपली अंडी घालते. त्यानंतर या अंड्यातून बाहेर येणाऱ्या पिल्लांच्या खाण्याची सोय म्हणून एखादी फुलपाखराची अळी, ढालकिड्याची पिल्लं, कोळी असे प्राणी पकडून त्यांना अर्धमेले करून या मडक्यात म्हणजे तिच्या घरट्यात भरून ठेवते. त्यामुळे जेव्हा तिच्या अंड्यातली पिल्लं बाहेर येतात, तेव्हा त्यांना जवळच खाद्य मिळतं आणि त्यांची वाढ होऊ शकते. आई हयात नसली तरी कुंभारमाशीची पिल्लं अनाथ होत नाहीत.

सस्तन प्राण्यांमध्ये मात्र अनेक जातींमध्ये मादी म्हणजे आई आपल्या बछड्यांची काळजी अगदी प्राणपणाने घेताना पाहायला मिळते. वाघांमध्ये तर वाघिणीला मातृत्वाची चाहूल लागली की, ती नराला हाकलून देते आणि मग पिल्लांना जन्म देऊन पुढे दोन वर्षं त्यांचा सांभाळ करेपर्यंत नराला आपल्या आणि पिल्लांच्या जवळही फिरकू देत नाही. हत्तींमध्ये कळपाची सूत्रं मादीकडेच असतात. मातृसत्ताक पद्धती असल्याने नव्याने जन्मलेल्या पिल्लांचं संरक्षण करणं, त्याला 'वळण' लावणं या गोष्टी कळपातील माद्या आलटून पालटून करतात. ओरँग उटान माकडांमध्येही पिल्लं वयाची दोन वर्षं आईलाच चिकटून असतात. पिल्लू सहा-सात वर्षांचं होईपर्यंत आई त्याची काळजी घेते, त्याला अन्न कसं शोधायचं हे शिकवते आणि धोक्यांपासून बचाव करायला शिकवते. सस्तन प्राण्यांमधील सर्वात वेगळा गट आहे 'मार्सुपियल'




म्हणजे पोटाच्या पिशवीत पिल्लं वाढवणाऱ्या कांगारूंचा. कांगारूचं पिल्लू जन्मतःच आंधळं असतं. त्याच्या अंगावर केस नसतात आणि आकार अगदी लहान, पाच ते सहा सेंटिमीटर इतकाच असतो. असे असाहाय्य पिल्लू जन्मल्याबरोबर आईच्या अंगावरील केसांचा आधार घेऊन आईच्या पोटाच्या पिशवीत जाऊन बसते. मात्र पुढच्या १९० दिवसांत त्याची झपाट्याने वाढ होते आणि ते आईच्या पोटावरील पिशवीतून बाहेर डोकावून बघू लागते. आईच्या पोटावरील पिशवीत २३५ दिवस राहिल्यानंतर मग मात्र ते बाहेर येऊन स्वतंत्र होते.

आईच्या वात्सल्याचे पदर किती प्रकारचे असतात, बघा!

**–मकरंद जोशी**
*makarandvj@gmail.com*
*(निसर्ग अभ्यासक व लेखक)*

*(लेखातील फोटो- युवराज गुर्जर, के. एस. सजवान आणि गूगल)*

# कल्पकला

## पाईपचा हत्ती



**साहित्य-** पाईपचा तुकडा, एक तारेचा किंवा जाड मजबूत दोऱ्याचा तुकडा, क्ले, गोंद.
**कृती-** पाईपच्या दोन्ही तुकड्यांना, तारेने किंवा दोऱ्याने बांधून घ्या. बांधलेल्या बाजूंना क्लेने पावलांचा आकार द्या. त्या नंतर वाकवलेल्या पाईपच्या वरील बाजूस, (फोटोत दाखविल्याप्रमाणे) क्लेने हत्तीचा चेहरा, सोंड आणि कान तयार करून चिकटवा. आता त्या चेहऱ्यावर पेन्सिलच्या टोकाने डोळ्यांचा आकार द्या. क्ले सुकल्यावर, त्याला छानपैकी रंगवा. अशाप्रकारे, हा छोटासा हत्ती तयार होईल.

**–स्वरूपा वक्नाली**
*swarupamv@gmail.com*




It was Christmas afternoon. Saleen, Karen and Kevin were lazing around after a sumptuous Christmas brunch. Saleen's sister Shanelle was studying in her room. She was in the twelfth standard. Karen and Kevin were cousins of Saleen and Shanelle and had come over for Christmas holidays. Saleen and Kevin studied in eighth standard. Karen was youngest, studying in fourth.

"Today is India-Sri Lanka one-day cricket final!" Saleen suddenly jumped. He switched on the TV and took out a black device from the drawer. He entered a password pressing some buttons on the device's dial. But the TV screen didn't accept it.

"What's this?" Kevin wondered.

"It's a remote for online streaming device connected to TV behind. Instead of cable connection, we use it to see different apps or videos on TV.

A normal TV thus becomes a smart TV…” Saleen described how it works as he entered the password once again, but the result was the same.

“I am sure Grandpa has changed the password.” Saleen cried. Just then, Karen found a pink note near the Christmas tree. It wasn’t there before. It read:

“Hey Kiddos,

This is your Grandpa. By now you must have realized that I have changed the TV’s password. How about a Password Hunt game till I return? Let’s see if you can crack it. If you don’t, wait for me…”

“Password Hunt?” Kevin and Saleen cried together.



“That would be fun! We had played Treasure Hunt in our school picnic. Let’s try Password Hunt. There is still time for the match to start.” Karen suggested. Saleen and Kevin agreed.

“Look, Grandpa has given a hint in the note to guess the password length. It says ‘Petals of a flower…’” Karen read. She went to the vase in which some daisies and roses were kept. She took a daisy flower and counted its petals.

“34. How can a password be so long?” Karen exclaimed as she took a rose to count its petals, “21. Neither can it be this long.”



“Karen, there are only 5 spaces on TV screen and all numbers. Password is maximum five numbers in length.” Kevin said.

“34, 21 are Fibonacci numbers[1].” Shanelle, who had taken a short break from her studies, intervened.

“Fee… bow… what’s that?” Kevin enquired.




“Fee..buh… naa… chee… It’s a number sequence named after the Italian mathematician Leonardo of Pisa or Fibonacci. In this sequence, each number is a sum of previous two numbers starting with 0 and 1. It goes 0, 1, 1,2, 3, 5, 8, 13 ,21, 34…” Shanelle explained as she found a note kept below the vase.

“Password length is the sixth number of Fibonacci sequence.” The note gave a clue.

“That’s ‘5’. The password length is ‘5’. We need to find five numbers of the password.” Saleen understood the concept and wrote on a paper.

“Perfect! Fibonacci sequence is nature’s code. You can find it in many things of nature. In fact, many flowers have petals in numbers of 3, 5, 8… which are Fibonacci numbers.”

Shanelle added.

"I just love when Professor Grandpa teaches Math in fun ways." Saleen said delighted.

"What next?" Kevin was impatient.

"The note also has the next hint: I am one number more and one number less than the seventh Fibonacci number." Shanelle read.

"These are two numbers. The seventh number in the sequence is '8'. So, one number more is '9' and one number less is '7'. That's '9' and '7'." Saleen calculated.

"Cool! The next clue: I hide Santa's amazing goodies. Gifts, toys and lots of candies..." Shanelle read.

"Stockings..." Karen shouted. She searched the stockings under the Christmas tree. One of them had a note. The note had the next hint: 'A number cubed is the number itself.'

"That's 1." Kevin screamed. All had started enjoying the game by now.

"The note also has the next clue - You put me on door, you wear me on head, I am all green, with tints of red..." Karen read.

"That's the wreath. Green leaves and red cherries in between." Saleen opened the main door decorated with a wreath. He found a note between its leaves.

"I am nothing, but am priceless. Without me, Math is baseless." Saleen read the hint.

"That's zero." Kevin answered again.

"Gotcha! Two more numbers of the password '1' and '0'... four numbers out of five." Karen said. Saleen read the next clue in the note, "In the day I shine bright; I always guide you in the night..."

"That's Sun, a star. It shines in the day. The Pole Star guides us at night. Grandpa is hinting at a star. Is the next hint somewhere near the Christmas Star?" Karen tried decoding the message. Saleen checked the shining golden Christmas Star atop the Christmas tree. There was a small note fixed behind it.

"I am a unique number[2], Prime and even[3], Binary[4] in computers uses zero and one..." Saleen read the note.

"That's '2', the smallest even prime number. Computers use binary system for computing which has base 2. It uses only two values 0 and 1." Shanelle answered.

"Bang on! We now have all the five numbers... '9', '7', '1', '0', '2'... But in what sequence should we enter them?" Kevin queried. Shanelle thoughtfully wrote their different combinations on paper.

"The password is 01729." She said after some time.

"How did you get it?" Saleen asked curiously.

"1729 is the famous Ramanujan number[5]. It is the smallest number expressed as sum of two cubes in two different ways." Shanelle said.

"Can you explain?" Karen asked.

"Cube of 10 is 1000 and 9 is 729. Their sum is 1729. Again, cube of 12 is 1728 and of 1 is 1 whose total is also 1729."

"Good job!" Grandpa said as he entered the room, "22nd December is the birthdate of Indian mathematician Srinivasa Ramanujan. It is celebrated as National Mathematics Day. I just added a '0' in the beginning to get the five digit length of password, without changing its value. Well, 1729 is also a Harshad number[6]."

"What's that?" Karen was all confused.

"Harshad numbers were defined by another Indian mathematician D. R. Kaprekar. A number, whose sum of digits completely divides that number, is a Harshad number. See, the sum of digits of 1729 is 19 and 1729 is completely divisible by 19. So it is also a Harshad number." Grandpa explained.

"Grandpa, Math is very complex." Karen sighed.

"But interesting..." Saleen gave thumbs up.

"Now that you have cracked the password, enjoy your match. By the way, Sri Lanka is batting 17 for 2 in 9 overs..." Grandpa smiled and all rushed to see the match.

**-Prachi Mokashi**

*mokashiprachi@gmail.com*

**या लेखातील इंग्लिश संज्ञांचे मराठी रुपांतर व त्यांचा अर्थ-**

१. फीबोनाची नावाच्या इटालियन गणितज्ज्ञाने शोध लावलेला संख्याक्रम. हा क्रम 0 आणि १ पासून सुरू होतो. पुढील संख्या ही मागील दोन संख्यांची बेरीज असते. उदा. ०, १, १, २, ३, ५, ८...

२. अद्वितीय संख्या

३. अनुक्रमे मूळ आणि सम संख्या


४. कॉम्प्युटरमध्ये वापरली जाणारी द्वयाधारी संख्या पद्धती. यात केवळ ० आणि १ या संख्यांचा वापर होतो.

५. रामानुजन नंबर १७२९ हा एक खास नंबर आहे, कारण याची बेरीज दोन वेगवेगळ्या प्रकारच्या घनांनी होते: $१०^३+९^३=१७२९$ आणि $१२^३+१^३=१७२९$

६. ज्या संख्येला तिच्या अंकांची बेरीज संपूर्णपणे विभागू शकते. तिला 'हर्षद संख्या' म्हणतात. १७२९ च्या अंकांची १९ ही बेरीज १७२९ला संपूर्णपणे विभागते म्हणून 'रामानुजन नंबर' हा 'हर्षद नंबर'ही आहे.

'वयम्'च्या साय-फाय कथा स्पर्धेतील विजेत्या २ कथा. आधी ३ प्रसिद्ध झाल्या आहेत, त्या तुम्ही वाचल्या असतीलच.

# THE MARSORMS



चित्र- आराध्य नाईक

RUSHHH...! And we landed. I saw red rust scattered in front of me.

"Shut down!" I said.

"Shall we activate the Rover now?" Mr. Noijot asked. Mr. Chan-Wei Noijot is originally Japanese, settled in Russia.

"Ok, this is the right time." I said.

So we boarded the Rover. Mr. Noijot drives very dangerously. So much so that even my mother drives better. A peeping of danger was going on in my mind.

"Oh no! Stop this now, man!" I stopped him, changed the place and kept the journey on. We reached the Martian colony and found some people there.

"Oh! You reached finally? How was the journey?" asked our boss.

"V...Very well..." I said and joined the discussion if life is possible on Mars.

"I think iron oxide will not keep them alive for a long time. Eh?" One scientist said.

"But it is possible that they can survive in it," said the other. We then moved to our dens. On some houses, it was written 'NASA'. Some were 'ROSMOSCOS'. Mr. Noijot got there. Lastly the Spacex, who first made it possible to live on Mars. I went there. It was a great feeling. Carbon dioxide was pressuring me but spacesuit was handling it. Some spacex astronauts were also living there. You would think that the CEO of the Agency might himself be living there, but there was no need for him to be there. I relaxed in my room. Then my boss said,

"You have a helicopter flight now."

Now say what? First I rode the Rover and then the helicopter? But ok. No problem. I got in the helicopter. Thup! Thup!! Thup!!! It started. It rose high and it was amazing. WIHII .... WHOOHOO.... I yelled. It was not our

regular helicopter. It was very different. A cube attached to a cubicle and blades attached to a MATCOY rod with a strong grip. I flew the helicopter very easily. Its power system, control …everything was sophisticated. Through a powerful binocular, I got to see the Martian surface which no one had ever seen. HMMM… WHAT IS THIS? I could see some small worms wriggling on surface. I immediately took photographs, noted the location and hastened back to colony. When I reached, I told the whole story to the scientists and took them there. They were dumb struck.

Chan Wei said, “If you dig 2-3 meters deep, the worms will come on the surface. Probably, when Mars became very hot, the big animals died and small ones went underground for hibernation”.

“What happened to water?” I asked.

“It trickled down and these worms found it underneath.”

“Can we use it for future?” I asked.

“Of course.”

We named these worms as Marsorms.

My boss invited me for special dinner. It was sans plates, glasses and taste. I was offered tablets of proteins, vitamins, minerals etc. It was over within seconds. I did not enjoy the insipid dinner. I remembered Indian spices, French fries, Japanese noodles, Spanish omelette and what not.

At night, people around me were sleeping, but I could not. I did not know what to do. I was just lying down, when I noticed the blue beautiful Earth as if calling me.

I...should...go back… tomorrow itself …SPRUSHHHHH…

**-Maitreya Mayur Aadkar,**

*5th, Vidyaniketan school, Dombivali (E)*

# मंगळावरचा अनुभव

**हुश्श!!** एकदाचे आलोच मंगळवार. आणि तेही कायमच्या वास्तव्यासाठी!! दचकलात ना!! याची पूर्वसूचना आम्हांला दहा वर्षांपूर्वीच दिली गेली होती म्हणजे २०४०मध्ये आणि आता २०५० हे वर्ष सुरू आहे. इलॉन मस्क आणि स्टिफन यांच्यासारख्या अनेक तज्ज्ञांनी हे शक्य करून दाखवलं. गेल्या पंधरा वर्षांत Technologyची भरभराट मी स्वतःच्या डोळ्यांनी पाहिली आहे. मंगळावर माणसाला पाठवणं जिथे शक्य नव्हतं, तिथे आता माणसाचं वास्तव्यसुद्धा शक्य करून दाखवलं. अर्थात हे काही सोपं नव्हतं. अखंड परिश्रम करावे लागले. आधी माणसाला मंगळावर पाठवले गेलं, नंतर त्याच्या माहितीप्रमाणे शोध घेऊन मंगळाला Terraform केलं गेलं. मंगळावर

९६ टक्के Carbon dioxide असून त्याचं रूपांतरण Oxygenमध्ये केलं गेलं. मंगळाला Atmosphere दिलं. आणि आता हळूहळू नद्याही बनताहेत. आम्हांला इथे वेगळे प्रकारचे Suits घालावे लागतात. आम्ही Underground राहतो. सगळं शहरच Underground वसलेलं आहे. कारण मंगळावर सूर्याचे किरण सरळ पडतात. म्हणजे जसं पृथ्वीवर Ozone Layer सूर्याची UV किरणं आपल्यापर्यंत पोहोचू देत नाहीत, कारण ते जीवसृष्टीसाठी हानिकारक आहेत तसं मंगळावर काहीच नाही. म्हणून त्या किरणांपासून वाचायला आम्ही Underground राहतो.

अरेच्चा!! मी प्रवासाबद्दल सांगायला विसरलेच की!! तर आमच्या प्रवासाचं प्रशिक्षण आम्हांला दिलं गेलं. अंतराळात प्रवास करायचा म्हणजे कठीणच. प्रशिक्षणानंतर आम्ही Space Shipमध्ये बसलो. आमच्या बरोबर अजून तीन कुटुंबं होती. एक तर माझी मैत्रीण नेहा हिचंच होतं. आणि घेतली झेप आम्ही असीम अंतराळात!! लाल ग्रहावर पोहोचायला आम्हांला सात महिने लागले. मग आला दृष्टिटप्प्यात, पृथ्वीपेक्षा लहान, भडक लाल, आणि आमचं पुढचं घर असा मंगळ.. मंगळाच्या एका शहरात आमची Space Ship उतरली. शहराचं नाव होतं Huyko. तिथे आमचं पुष्पगुच्छाने स्वागत केलं गेलं. आता आम्ही Martian झालो होतो!! मी पूर्ण शहराला फेरफटका मारला. शहरांमध्ये बांधणी अजून चालू होती. मी आणि नेहा चकित झालो. लाल माती आणि मोठमोठाले craters होते. त्या cratersच levelling सुरू होतं. आम्हांला सूर्य पृथ्वीपेक्षा अर्धा दिसत होता. जेवण सगळं सुकंच होतं. फ्रेश काही मिळत नाही. रात्री झोप कशी लागणार? नव्या ग्रहाबद्दल ओढ निर्माण झाली होती. रात्री चंद्र पाहिला आणि वेगळेच वाटलं. हो, कारण दोन चांदोबा आकाशात होते. आणि दोन्ही आपल्या पृथ्वीच्या चंद्रापेक्षा फार लहान. Phebos आणि Deimos ही त्यांची नावं. दुसऱ्या दिवशी आम्ही Olympus Mons पाहायला गेलो. Huyko हे शहर त्याच्या जवळच वसलेलं आहे. मी इतका मोठा ज्वालामुखी कधीच पाहिला नव्हता. तो आता Inactive होता म्हणून आम्ही आतूनही बघू शकत होतो. त्याचा रंग किती लाल होता आणि लाव्हा जेव्हा याच्यातून निघत असेल तेव्हा तर वातावरणच लालेलाल होऊन जाईल. आणि हो ते कमालीच खोलही होतं. दर चार तासात एक चंद्र आम्हांला दिसतो. आम्ही एका streambedला पण बघितलं. त्याच्याकडे बघून खात्री होते की, हजार वर्षांपूर्वी इथे नद्या वाहत. पण आमच्या पृथ्वीच्या घराची फार आठवण येते. मंगळावर स्थायिक व्हायचं हे आधी ऐकून फार मज्जा वाटायची. पण पृथ्वीची आठवण तर आल्याशिवाय राहात नाही. इथे आता शाळेचे बांधकाम सुरू आहे. आई-बाबा लवकरच इथे सेवेत रुजू होणार आहेत. सगळं परत ठीक होऊन जाईल, पण मायभूमीची उणीव तर भासणारच ना !!



*चित्र- रिया पटवर्धन*

P.S.- हे जरी काल्पनिक असलं, तरी या प्रिय वसुंधरेचा आपल्याला त्याग करावा लागेल अशी परिस्थिती उद्‌भवू नये हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**-श्रेया प्रशांत पाटील,**
*नववी, विराज श्री राम सेंटेनियल स्कूल*
*बोइसर, पालघर*

# डॉ. अनिकेत सुळे

‘माझे किशोरवय’मध्ये आज आपण भेटणार आहोत, डॉ. अनिकेत सुळे यांना. होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र, मुंबई इथे ते सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकी ऑलिम्पियाडचे ते महासचिव आहेत. डॉ. अनिकेत सुळे यांनी रुईया महाविद्यालयातून भौतिकशास्त्रात B.Sc., IIT मुंबई इथून भौतिकशास्त्रात M.Sc. आणि Astro-physical Institute Potsdam, जर्मनी इथून खगोलशास्त्रात Ph.D. केलं आहे. सध्या खगोल शिक्षण, गणित शिक्षण आणि भारतीय खगोलशास्त्राचा इतिहास या विषयांत त्यांचे संशोधन सुरू आहे. त्यांना विज्ञानाची गोडी कशी लागली, तर्कसंगत विचार करण्याची व सखोल अभ्यासाची सवय कशी जडली, ते आपण जाणून घेऊया.



**लहानपणापासूनच** मला वाचायची प्रचंड आवड होती. माझ्या आवडीची पुस्तकं असणारी लायब्ररी माझ्या घराजवळ नव्हती. त्यामुळे बरीचशी पुस्तकं तेव्हा मला आई-बाबांनी विकत आणून दिली होती. मी पुस्तकं वाचताना त्यात इतका समरस होऊन वाचायचो की घरी कुणी आलं-गेलं तरी मला कळत नसे! माझ्या लहानपणी टी.व्ही. फारसा नव्हता आणि इंटरनेट तर नव्हतंच. त्यामुळे शाळा आणि अभ्यासेतर वेळ भरपूर मिळायचा. मी पाचवीत असताना मला माझ्या मित्रांनी सांगितलं की, सायनला ‘खगोल मंडळ’ ही खगोलशास्त्रात काम करणारी संस्था आहे, तिथल्या लायब्ररीत खगोलशास्त्राची पाचेकशे पुस्तकं आहेत! मी

खगोलमंडळात जायला लागलो आणि तिथली सगळी पुस्तकं वाचून काढली. खगोलमंडळाचे आकाशदर्शनाचे कार्यक्रमही पावसाळा सोडला तर इतर वेळी सुरू असायचे. त्यात मी कार्यकर्ता म्हणून जायला लागलो. ऑक्टोबर १९९५ मध्ये भारतातून खग्रास सूर्यग्रहण दिसणार होतं. तेव्हा मी दहावीत होतो. त्यावेळी सूर्यग्रहणाविषयी लोकांमध्ये जागृती निर्माण करायची, असं खगोल मंडळाने ठरवलं होतं. आम्ही सुमारे ४०० शाळांमध्ये जागृतीचे कार्यक्रम केले होते. तेव्हा मी पहिल्यांदा या विषयाबद्दल मुलांसमोर जाऊन बोललो.

मी सातवीपर्यंत दादरच्या शिशुविहार शाळेत होतो आणि आठवीपासून बालमोहन विद्यामंदिरमध्ये होतो. बालमोहन शाळेची लायब्ररी खूप चांगली होती. त्यामुळे शाळेच्या लायब्ररीतली पुस्तकं भरपूर वाचली. आठवीत असताना डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची पुस्तकं वाचली. देव मानणं, न मानणं हे बऱ्याचदा मोठी माणसं सांगतात, म्हणून आपण करतो. पण मला वाटतं, आपण स्वतःचा विचार स्वतः करायला हवा. मला तेव्हा देव मानणं हे तर्कसंगत वाटलं नाही, त्यामुळे माझा देवावर विश्वास नाही, हे माझं आठवीतच ठरलं होतं. मी पाचवी ते आठवीच्या दरम्यान पुलं, वसंत कानेटकर, वि. स. वाळिंबे, ना. सं. इनामदार अशा सगळ्या लेखकांची पुस्तकं वाचली होती. नंतर नववी-दहावीत ‘नाझी भस्मासुराचा उदयास्त’, ‘व्होल्गा जेव्हा लाल होते’, ‘बाराला दहा कमी’ अशी वैचारिक पुस्तकं वाचली. दया पवार, आनंद यादव, नामदेव ढसाळ, अरुण साधू यांची पुस्तकंही त्या वयात वाचायला लागलो.

आता अभ्यासाच्या दृष्टीने सांगायचं तर चौथीत असताना घरी आईने माझा स्कॉलरशिपचा अभ्यास घेतला होता आणि शाळेत शामाताईंनी. अभ्यासाची सवय कशी करायची, टाइमटेबल कसं ठरवायचं,




टार्गेट्स कशी ठेवायची, ती साध्य कशी करायची, हे सगळं आईने शिकवलं. चौथीच्या स्कॉलरशिपच्या परीक्षेत मी मुंबईत पहिला आलो होतो. त्यावरून आईला कळलं की मला स्पर्धापरीक्षांचं मर्म समजतंय. मग आईने माझ्यासाठी अशा परीक्षा शोधून काढल्या की, ज्यामुळे मला केवळ सर्टिफिकेट नाही तर ज्ञान मिळेल. परीक्षा आहे म्हणून परीक्षेचा अभ्यास करायचा असं आमच्याकडे नव्हतं, तर एखाद्या विषयाचा अभ्यास करायचाय म्हणून परीक्षा द्यायची, असा हेतू होता. त्यामुळे आईने माझ्यासाठी परीक्षांचा एक प्लॅनच तयार केला होता. इतिहास, भूगोल, गणित, विज्ञान, भाषा सगळ्याच विषयांची मला आवड होती. पुढे जेव्हा मी बालमोहन शाळेत गेलो तेव्हा तिथे दहावीची तयारी आठवीपासून करून घेत असत. आठवी, नववीत भाषांची आणि दहावीत सगळ्या विषयांची! आठवीपासून सुरू होणाऱ्या त्या सराव वर्गांना दुसऱ्या शाळेतले तज्ज्ञ येत असत. आमच्या शाळेत गिरगावातून लिमये सर यायचे. दहावीत

इंग्लिश आणि संस्कृतच्या सराव वर्गाला ते आले होते, तेव्हाच त्यांनी सांगितलं होतं की 'जर मेरिट लिस्टमध्ये यायचंय एवढीच इच्छा असेल तर माझ्या वर्गाला येऊ नका!' कारण या सराव वर्गांचा उद्देश फक्त परीक्षेत मार्क्स चांगले मिळवणं एवढाच नसायचा तर विषय समजणं हा असायचा. लिमये सर आम्हांला फक्त पुस्तकातले धडेच नाहीत, तर एकूणच भाषा शिकवायचे. इंग्लिश भाषा कशी आहे, वेगवेगळे लेखक ती भाषा कशी वापरतात, expressions कशी evolve होत गेली वगैरे ते अगदी ओघवत्या शैलीत सांगायचे. मराठी, इंग्लिश, हिंदी, संस्कृत या भाषांवर त्यांचं प्रभुत्व होतं. काहीही शंका असतील तरी त्यांना आम्ही त्या विचारू शकायचो. त्यांच्याकडून त्या शंकांचं निरसन निश्चितच व्हायचं. एक वेगळी दृष्टी मिळायची. (हे सुहास लिमये सर आमीर खानला मराठी भाषा शिकवल्यामुळे प्रसिद्ध झाले होते. गेल्या वर्षी त्यांचे निधन झाले.)

शाळेतले नियमित विषय शिकवणाऱ्या गणिताच्या चौधरी बाई आणि मराठे सरांमुळे मला गणिताची गोडी लागली. त्यांनी ज्या प्रकारे गणित शिकवलं, त्याचा वेगळा विचार करायला शिकवला, एका प्रश्नातून दुसरं गणित तयार करायला शिकवलं ते फार मोलाचं होतं. दोन्ही शाळांमधल्या सगळ्या शिक्षकांनी जे शिक्षणाचे संस्कार केले, ते आयुष्यात खूप उपयोगी ठरले.

मी दहावीत असताना 'फलश्रुती'चे प्रश्नसंच सोडवायचो. तेव्हा आमच्याकडे सकाळचे दोन तासच पाणी यायचं. त्यामुळे घरातल्या सगळ्यांनाच पाणी भरून ठेवण्याच्या कामात सहभागी व्हायला लागायचं. मी सकाळी उठल्यावर त्या दिवशी किती वेळ हातात आहे, हे बघून कुठला पेपर सोडवायचा ते ठरवायचो.

माझे आई-बाबा दोघेही माटुंग्याच्या खालसा महाविद्यालयात भौतिकशास्त्र शिकवायचे. माझ्या तीन आत्याही भौतिकशास्त्राच्या शिक्षिका! त्यामुळे भौतिकशास्त्राची आवड पहिल्यापासूनच माझ्यात निर्माण झाली. आईने माझ्या अभ्यासावर खूप मेहनत घेतली. ती माझे पेपर्स चेक करून द्यायची. माझा अभ्यास वेळच्या वेळी पूर्ण असायचा. माझ्या दहावीच्या परीक्षेच्या वेळी इतिहासाच्या पेपरच्या आदल्या दिवशी माझ्या लक्षात आलं की, माझं इतिहासाचं पुस्तक मित्राकडेच राहिलंय. पण माझा सगळा अभ्यास आधीपासूनच तयार असल्यामुळे पुस्तक राहिलं तरी काही फरक पडला नाही.

माझ्या आईला जुन्या हिंदी गाण्यांची खूप आवड असल्यामुळे तिने रेडिओवर लागणाऱ्या गाण्यांच्या बऱ्याच कॅसेट्स रेकॉर्ड केल्या होत्या. ती गाणी ऐकत अभ्यास करण्याची सवय मला लागली. त्यामुळे अजूनही काम करताना मी गाणी ऐकतो. कुठली गाणी चांगली आणि कुठली नाहीत हे कळण्याचा कान तेव्हाच तयार झाला.  आठवी-नववीत असताना मी विम्बल्डन आवडीने बघायचो, खेळाचीही आवड होती. माझा भाऊ माझ्यापेक्षा तीन वर्षांनी लहान आहे. त्याचं लॉजिकल थिंकिंग प्रचंड चांगलं आहे. कुठल्याही प्रश्नाचं उत्तर शोधताना 'आपल्याला उत्तर आलं पाहिजे' हा त्याचा हट्ट असतो आणि 'उत्तर असंच का आलं' हे शोधून काढणं हा माझा अट्टहास असतो!

किशोरवयात लाभलेले शाळेतले आणि सराव-वर्गातले शिक्षक, खगोल मंडळ, पुस्तकं आणि अर्थातच आई-बाबांचं मार्गदर्शन या सगळ्यामुळे माझ्या पुढच्या कारकिर्दीचा भक्कम पाया रचला गेला, असं नक्कीच म्हणता येईल!

Email- aniket.sule@gmail.com

**-शब्दांकन : अंजली कुलकर्णी-शेवडे**

*anjalicoolkarni@gmail.com*

*(प्रसिद्ध निवेदिका)*




‘आयुर्वेद’ व ‘चिकित्साशास्त्र’ या विषयांत निष्णात म्हणून प्रसिद्ध असलेल्या जमदग्नी ऋषींची ही पुराणकथा.

# जमदग्नी ऋषी



**सरस्वती** नदीच्या तीरावर एक आश्रम होता. तिथे जमदग्नी ऋषी संशोधन व वेदरचना करत पत्नी रेणुकेसह राहात होते. पुराणकाळात हैह्यवंशीय राजांचा अत्याचार प्रमाणाबाहेर वाढला होता. ते अत्याचार कसे थांबवता येतील, याचा विचार जमदग्नी ऋषी करत होते. जमदग्नी ‘ऋषी’ असल्यामुळे त्यांनी शिकार करणे, युद्ध करणे समाजाला मान्य नव्हते. मात्र सराव असावा म्हणून ते बाणांचा वर्षाव करायचे. ते बाण कुठेतरी जाऊन पडायचे. एकदा भर दुपारी ते बाणवर्षाव करत होते. बाण गोळा करून आणण्याचे काम त्यांची प्रेमळ पत्नी रेणुका करत होती. मध्यान्हाची वेळ, सूर्य माथ्यावर. त्यामुळे जमीन कडकडीत तापलेली... रेणुकेच्या नाजूक पायांना चटके बसत होते. तळपाय पोळल्याने ती झाडाच्या सावलीत मटकन बसली. थोड्या वेळाने परतली. तिला उशीर झाल्याने जमदग्नींच्या रागाचा पारा वर चढला होता.

“रेणुका, तुला एवढा उशीर का झाला? एवढा वेळ काय करीत होतीस?” आवाज उंचावून जमदग्नींनी विचारले.

“सूर्याच्या कडक उन्हामुळे माझी पावलं होरपळली. घामाच्या धारा वाहू लागल्या. जरा सावलीत बसले, तेव्हा कुठे बरं वाटलं.”

...आता यात रागावण्याजोगे काय होते? पण ते जमदग्नी ऋषी होते. त्यांच्या नावाला साजेसा भडकू स्वभाव होता त्यांचा! त्यांना संतापाच्या उकळ्या फुटू लागल्या. मात्र या वेळी त्यांच्या संतापाचा रोख रेणुकेवर नव्हता, तर सूर्यावर होता. त्यांनी धनुष्याला बाण लावला आणि सूर्याकडे रोखला. सुदैवाने सूर्याला तो बाण दिसला. अवघ्या एका बाणफेकीने ते आपल्याला आकाशातून खाली

फेकून देऊ शकतात, हे सूर्य जाणून होता. मात्र आपण काय अपराध केलाय म्हणून हे ऋषी एवढे रागावलेत, हे काही सूर्याला कळेना. तो पुरता गोंधळला. तो जमदग्नींपाशी आला. "ऋषिवर्य, माझे काय चुकले?" त्याने नम्रपणे विचारले.

"सूर्या, तू माझ्या पत्नीची पावले पोळलीस. तुझ्या उन्हामुळे तिला भराभरा चालता येईनासे झाले."

"अहो, तेवढ्यासाठी आकाशातून मला उपटून टाकायची गरज नाही. मी तुम्हांला दोन भेटवस्तू देतो."

सूर्याने नारळाच्या झावळ्या घेतल्या. त्या जोडून एक छत्री बनवली. झाडांच्या सालीपासून दोन चपला केल्या. छत्री कशी धरायची, पायताणे कशी वापरायची, हेही त्याने रेणुकेला शिकवले. रेणुकेचा आनंद गगनात मावेना! या दोन वस्तू आजही संपूर्ण मानववंशाला किती उपयुक्त आहेत ना?

जमदग्नी ऋषी व रेणुका या जोडप्यातील प्रेम आणि साधेपणा बघून सूर्य प्रभावित झाला होता. त्याने त्याची इच्छा बोलून दाखवली की, लवकरच मी तुमचा पुत्र म्हणून जन्मास येईन. 'तो' पुत्र म्हणजे परशुराम. परशुराम हा पुढे उत्तम योद्धा निपजला. अशी ही पुराणकथा आहे!

जमदग्नी ऋषी 'आयुर्वेद' व 'चिकित्साशास्त्र' या विषयांत निष्णात म्हणून प्रसिद्ध होते. त्या काळात देव आणि दानवांनी केलेल्या समुद्रमंथनातून अनेक दैवी गोष्टी बाहेर आल्या. यामध्ये नंदिनी, शुभदा, सुरभी, सुशीला आणि बहुला या पाच कामधेनू सापडल्या. कामधेनू म्हणजे सर्व इच्छा पूर्ण करणाऱ्या गायी. या पाच कामधेनू जमदग्नी, भारद्वाज, वसिष्ठ, अगस्ती आणि गौतम या पाच ऋषींना देण्यात आल्या. या कामधेनूंचा उपयोग समाजाच्या कल्याणासाठी व्हावा, या हेतूने त्या या पाच श्रेष्ठ ऋषींकडे सोपविण्यात आल्या होत्या म्हणे. या कामधेनूंच्या गोमयापासून (शेणापासून) बेल, गुग्गुळ या झाडांचे पोषण झाले. गायींच्या दुधाच्या घृतापासून (म्हणजे तुपापासून) पुढे अनेक आयुर्वेदिक औषधांची निर्मिती झाली, असे म्हटले जाते. आपल्याकडे सोपवलेल्या कामधेनूचा जनकल्याणासाठी वापर करण्याच्या इच्छाशक्तीतून त्यांनी इतके संशोधन केले. पुढे हैह्य राजा कार्तवीर्य अर्जुन याचा उन्माद अधिकच वाढला, तेव्हा त्याने जमदग्नींच्या आश्रमातील कामधेनू बळजबरीने पळवली. या पळवलेल्या कामधेनूचा तो गैरवापर करू शकतो, त्यातून समाजाला त्रास होऊ शकतो, हे लक्षात येऊन परशुरामाने कार्तवीर्य अर्जुनाशी युद्ध करून कामधेनू पुन्हा आश्रमात आणली. अशा रीतीने जमदग्नींचा समाजाच्या उद्धारासाठी उत्तरदायित्व घेण्याचा वारसा पुढे चालवला.

**–कांचन जोशी**
*kanchanpjoshi76@gmail.com*
*(संस्कृत अभ्यासक)*

चपखल उत्तरं– १. कुंजर, गज २. तरू, वृक्ष ३. जल, नीर, तोय ४. सुमन, कुसुम, पुष्प ५. रवी, सविता, तेजोनिधी ६. इच्छा, आकांक्षा ७. अपूर्व, विलक्षण ८. अवनी, वसुंधरा, धरित्री ९. नयन, नेत्र, चक्षू १०. पथ, वाट, रस्ता ११. विलंब, दिरंगाई १२. प्रवाह, वेग, कल, समुदाय, क्रम

# जीभ व डोळे तृप्त करण्याची किमया



**घरातले** दिवाळीचे पदार्थ आता केव्हाच संपले असतील. पण खरं तर घरी कितीही फराळ असला, तरी आपल्याला बाजारातील मिठाईची दुकानं खुणावतातच. तिथले सुंदर नटलेले, जरा हटके दिसणारे पदार्थ हवेहवेसे वाटतात. आपल्या दिवाळीसारखाच माहोल पाश्चिमात्य देशांमध्ये नाताळच्या वेळी असतो. दिवाळीसारखा उत्साह तिथे नवीन वर्षाच्या स्वागतासाठी असतो. 'होम अलोन'सारख्या इंग्रजी सिनेमांमधून ते वातावरण तुम्ही पाहिलं असेल. पुण्या-मुंबईचे मॉल्स नाताळ, नवीन वर्षासाठी नटतात. त्याच्या कितीतरी पट अधिक झगमगाट, खाद्यपदार्थांनी सजलेली दुकाने, उपहारगृहे पाश्चात्त्य देशांमध्ये या दिवसांत दिसतात.

आज तुमची ओळख एका अशा दोस्ताशी करून देणार आहे, जो आहे इथलाच, पण अमेरिकेतल्या न्यूयॉर्कसारख्या मोठ्या शहरातील लोकांना नवीन वर्ष साजरं करण्यासाठी एकसे एक मस्त पदार्थ असे काही सजवून–नटवून देतो की ते पाहाताच तोंडाला पाणी सुटलंच पाहिजे. डोळे आणि जीभ या दोन्हींना तृप्त करायची किमया या दोस्ताकडे आहे. मुंबईत लहानाचा मोठा झालेला, अवघा पंचविशीतला नील काजळे आज अमेरिकेत एक 'शेफ' म्हणून नावारूपाला येतोय.

नीलला लहानपणी पनीर, पास्ता हे प्रकार खूप आवडायचे. त्याची आईही कौतुकाने वेगवेगळ्या पाककृती करून आपल्या मुलांना खाऊ घालायची. पण लवकरच धाकट्या नीलचं वेगळेपण दिसू लागलं. घरातल्या कोणाला काय आवडतं, कोणत्या मित्राला कोणता पदार्थ विशेष आवडतो हे निरीक्षणातून नील लक्षात ठेवायचा. रात्री आईने पुलाव केला, तर लहानसा नील त्यातला थोडा कसा डब्यासाठी उरेल आणि मित्राला देता येईल हे बघायचा. आई स्वयंपाक करताना नेमकं काय काय करते हे त्याच्या सहज लक्षात राहू लागलं. नीलचे बाबा 'एअर इंडिया'त. त्यांच्यामुळे लहान वयातच वेगवेगळ्या देशांमध्ये नीलला हिंडता आलं. एरवी परदेशी हिंडायला जाणारी मंडळी आपलं जेवण मिळत नाही म्हणून हैराण होतात. पण नील हौसेने वेगवेगळ्या चवींचा आस्वाद घेई. अशा अनेक गोष्टींतून त्याची खाण्यातली आवड आणि त्यातल्या बऱ्या-वाईटाची सहज पारख करण्याचं कौशल्य घरच्यांच्या लक्षात येऊ लागलं. नील अभ्यासात हुशार होता. नऊ वर्षांपूर्वी दहावीत त्याला ९० टक्के मिळाले होते. एवढे मार्क मिळाले की,

अनेक पालक मुलांवर इंजिनीअर, डॉक्टर, सीए बनायचं दडपण आणतात. पण 'तू काहीही शिक, पण त्यात अग्रणी ठरायचा मनापासून प्रयत्न कर', एवढंच त्याच्या आई-वडिलांचं म्हणणं होतं. 'हॉटेल मॅनेजमेंट'ला जायला जी प्रवेश परीक्षा असते, तीत उत्तम रँक मिळवून नीलने अव्वल दर्जाच्या दादरच्या केटरिंग कॉलेजमध्ये प्रवेश मिळवला.

हॉटेल मॅनेजमेंटमध्ये तीन वर्षांचा हा बीएस्सीचा अभ्यासक्रम करताना अगदी दुसऱ्या वर्षापासून नीलने विविध ठिकाणी प्रशिक्षणासाठी उमेदवारी करायला सुरुवात केली. पंचतारांकित ताजमहाल हॉटेलात तर सलग ५-६ महिने जाऊन आवश्यक ते प्रशिक्षण नीलने घेतलं. केवळ छान पदार्थ बनवणं म्हणजे शेफ होणं किंवा हॉटेल व्यवस्थापन जमणं नव्हे. किचनचं व्यवस्थापन, स्वच्छता, कमीत कमी खर्चात किचन चालवणं, त्यासाठी अनेकांशी वाटाघाटी आदी हॉटेल व्यवस्थापनाचे अन्य धडेही नीलने गिरवले.



पुढे त्याने जगप्रसिद्ध 'दि क्युलीनरी इन्स्टिट्यूट ऑफ अमेरिका' इथे जाऊन पदव्युत्तर शिक्षण घ्यायचं ठरवलं. अमेरिकेत जाऊन शिकणं हे खायचं काम नाही. त्यासाठी प्रचंड पैसाही लागतो. नीलने आपल्या प्राविण्याच्या बळावर अनेक शिष्यवृत्त्या मिळविल्या. शिकताना एकीकडे नोकरी करीत खर्चिक अमेरिकेत राहणं त्याने जमवलं. अमेरिकेतली पाकशास्त्रातली ही 'असोसिएट' पदवी नीलने विशेष प्राविण्याने मिळवली. शिवाय वाइनच्या अभ्यासात त्याला सर्वाधिक गुण मिळाले. फेब्रुवारी २०२१ला हे शिक्षण पूर्ण केल्यावर न्यूयॉर्कमधील प्रख्यात हॉटेलात नील काही काळ शेफ होता. सध्या तो 'हेवन्स किचन सॉसेस' या अमेरिकेतल्या प्रख्यात कंपनीत टेस्ट मॅनेजर आहे.

नवनवीन पाककृती तयार करणं, त्या कंपनीच्या यूट्युब चॅनेलवर करून दाखविणं, हे व्हिडिओ करताना प्रसंगी दिग्दर्शकाचा झगा घालणं अशी अनेक कामं तो करतो. नीलशी मी जेव्हा व्हॉट्सॲप कॉलवर बोलले तेव्हा त्याने त्याच्या काही लोकप्रिय पाककृती उदा. चिमांचुरी रोस्टेड ब्रुसेल, गोल्डन सॅफ्रन पास्ता, बंगाली दाब चिंगरी, काकडी, कलिंगड यांचं सलाड अशा कितीतरी रेसिपींचे फोटोही पाठवले. ते बघूनच माझ्या तोंडाला पाणी सुटलं. मी नीलला विचारलं, "यातलं तुला काय खायला आवडतं?" त्यावर नील म्हणाला, "खरं तर सतत १०-१२ तास उभं राहून स्वयंपाक केला की, स्वतः फारसं खावंसं वाटतच नाही. खाणाऱ्यांचे आनंदी चेहरे बघूनच माझं पोट भरतं."

पंचविशीतल्या नीलला अमेरिकेसारख्या भुलभुलैय्या देशात राहात असूनही मज्जा करायला मात्र वेळ नाही, इच्छाही नाही. त्याचं एकच ध्येय आहे की, कधीतरी आयुष्यात सर्वांच्या जिभेवर चव रेंगाळेल, सर्व खवय्ये नावाजतील असं एक स्वतःचं रेस्टॉरंट सुरू करायचं.

अलीकडे हे क्षेत्र तुमच्यातल्या अनेकांना खुणावतंय. म्हणून मोठी झेप घेण्यासाठी सज्ज असलेल्या कष्टाळू नीलची ओळख मुद्दाम करून दिली.

*(संपर्क- neel@havenskitchen.com)*

**-विशाखा कुलकर्णी**
*vishakha.naik.kulkarni@gmail.com*

अहम् आवाम्
वयम्
कल्पक, चौकस किशोरांचे मासिक
'वयम्' न्यू वंदना को.ऑप.हा.सो., ३रा मजला, लालबहादूर शास्त्री मार्ग, वंदना सिनेमाजवळ, ठाणे- ४००६०२.
दूरध्वनी : ०२२-२५९८६२७० इमेल : info@wayam.in वेबसाइट : www.wayam.in

**वाचकांमध्ये 'वयम्'ची लोकप्रियता वाढत आहे. 'वयम्'चे सभासदत्व घेण्यास उत्सुक असलेल्यांच्या सोयीसाठी आमच्या प्रतिनिधींची ही यादी. हे 'वयम्' प्रतिनिधी म्हणजे 'वयम्'चा प्रसार प्रेमाने करणारे दूत आहेत.**

# 'वयम्' प्रतिनिधी

**पुणे (चिंचरी-पिंपवड)**
सुप्रिया पुराणिक
7030360758

**गोरेगाव-मुंबई**
अनघा अनिल चंद्रात्रे
8080550353

**अंधेरी-मुंबई**
प्रदीप पाटील
9819063069

**गिरगाव-मुंबई**
मेसर्स बी.डी.बागवे एजन्सी
7506000869

**वरळी-मुंबई**
संजना चव्हाण
9221969336

**डोंबिवली**
सुनिल पांचाळ
9930016920

**कल्याण**
डॉ. योगेश जोशी
9757077614

**कल्याण**
विकास वाचनालय (DSK)
9819931421

**बदलापूर**
नेत्रा नरवणे
9604677297

**अलिबाग**
श्रुती संतोष बोंद्रे
9423381129

**रत्नागिरी**
गार्गी केदार देवस्थळी
9404331020

**कणकवली-मालवण**
सुषमा केणी
9284035326

**वेंगुर्ला-सिंधुदुर्ग**
मधुरा नित्यानंद आठलेकर
9405925454

**परभणी**
राजेश वि. कांबळे
8624904747

**कराड**
संजय पुजारी **(डॉ.कल्पना चावला विज्ञान केंद्र)**
9226163260

**नांदेड**
शिवाजी आंबुलगेकर
9423440598

**लातूर**
ज्ञानप्रकाश बालविकास केंद्र
9421693089

**लातूर**
वैद्य जयश्री कुलकर्णी
9326190749

**बुलडाणा**
नरेंद्र लांजेवार
9422180451

**कोल्हापूर**
डॉ. धनश्री खाडे
9604636893

**अकोला**
उत्कर्ष जैन
9850263103

***SWS* फायनान्शिअल सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड**

**नाशिक**
रुपाली कुलकर्णी
9011896681

**मुंबई**
किशोर काळे
9869239940

ऑनलाइन इंग्रजी बोलायला शिकण्याची
THE KINGS' English Academy
'वयम्'च्या वाचकांसाठी सुवर्णसंधी. केवळ 2000/- रुपये भरा आणि एक महिना ऑनलाइन क्लास आणि दोन वर्षांसाठी 'वयम्'चे सभासदत्व मिळवा. **विद्यार्थी, शिक्षक, महिलांसाठी स्वतंत्र बॅच.**
**संपर्क- प्रा. श्रुती राजे**
8421113111
9822240106

कल्पक, चौकस
किशोरांचे मासिक

अहम् आवाम्

# वयम्

आपणसारे

न्यू वंदना को. ऑप. हाऊसिंग सोसायटी, ३रा मजला,
लालबहादूर शास्त्री मार्ग, वंदना सिनेमाजवळ, ठाणे ४०० ६०२
दूरध्वनी : ०२२-२५९८६२७०/७१/७२/७३
'वयम्' मोबाइल : ९१३७१२८९१५ राजेंद्र : ९९२०७२४६२७
इ-मेल : info@wayam.in
वेबसाइट : www.wayam.in



## सभासद नोंदणी फॉर्म

**१ वर्ष**
**₹ ६००/-**

**१० + १ दिवाळी अंक**

नोंदणी क्रमांक : ............ दिनांक : ............

नाव : ............

पत्ता : ............

............ पिन कोड : ............

जवळची खूण : ............

फोन : ............ इमेल : ............

जन्मतारीख : ............ इयत्ता : ............

शाळा : ............

वर्गणी जमा केल्याचा तपशील

चेक नं. : ............ बँक व बँक शाखा : ............

चेक दिनांक : ............ रुपये : ............

'वयम्'च्या ऑनलाइन सबस्क्रिप्शनसाठी माहिती–

Labindia Analytical Instruments Pvt. Ltd.
Axis Bank, Thane | CC A/C No.: 911030017556004 | IFSC : UTIB0000061

चेक / डिमांड ड्राफ्ट : लॅबइंडिया ॲनॅलिटीकल इन्स्ट्रुमेंटस प्रा.लि.
(Labindia Analytical Instruments Pvt. Ltd.) या नावाने काढावा.

सही : ............



*'वयम्' मासिकाचे वर्गणीदार झाल्याबद्दल धन्यवाद!*

RNI NO.MAHMUL/2013/53138 POSTAL Reg. No.THC/85/2020-22 Post at Mumbai Patrika Channel Sorting Office G.P.O. Mumbai 400 001
Published on 1st of every month and posted on 5th of every month

50Th Year of Banking Excellence

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक



# टीजेएसबी गोल्ड लोन

आपल्या महत्वकांक्षेला द्या नवा आकार,
अन् करा आपले स्वप्न साकार !

फक्त **0.67%*** दरमहा

## फायदे

• शून्य प्रोसेसिंग फी • गॅरेंटरची आवश्यकता नाही • कागदपत्रांची सहज व सोपी पूर्तता
• त्वरित कर्ज मंजुरी आणि वितरण • दागिन्यांच्या सुरक्षिततेची हमी • प्रीपेमेन्ट शुल्क माफ

*अटी लागू

www.tjsbbank.co.in | Toll Free: 1800 223 466 / 1800 266 3466